
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २७४
www.ramprahar.com
मंगळवार, २२ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

तक्रार केली म्हणून नेरळमध्ये तरुणावर प्राणघातक हल्ला/२
सूर्य कोपला! अंगाचा दाह, उष्माघाताचा धोका/६
बीसीसीआयकडून वार्षिक कराराची घोषणा/८

## देशातील १७ राज्यांमध्ये अवकाळी पावसाचा इशारा

**नवी दिल्ली :** देशभरात पुन्हा एकदा अचानक वातावरणात मोठा बदल झाल्याचे पहायला मिळत



आहे. भारतीय हवामान विभागाकडून देशातील जवळपास १७ राज्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, काही ठिकाणी गारपिटीसह पावसाची शक्यतादेखील आहे. जम्मू-काश्मीर, लडाखमध्ये बर्फवृष्टीसोबतच मुसळधार पाऊस, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये विजांचा कडकडाटासह वादळी पाऊस पडू शकतो. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये ढगाळ वातावरण राहणार असून या राज्यांमध्येही पावसाची शक्यता आहे. दिल्लीमध्ये ढगाळ वातावरण राहील, पण पावसाची शक्यता नाही. पूर्व भारतात अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, त्रिपुरा, दक्षिणेत कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगाणा आणि तामिळनाडूमध्ये जोरदार पावसाचा इशारा आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात उष्णतेची लाट दिसून येणार आहे.

# भाजपची संघटनात्मक बांधणी

## राज्यात ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे संघटन पर्व सध्या जोमाने सुरू आहे. यामध्ये राज्यभरात एकूण १२२१ मंडळे स्थापन करण्यात आले असून त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजप संघटनेत एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. मंडळ अध्यक्षांची नियुक्ती प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावी पद्धतीने झाली आहे. संघटन हेच खरे बळ या तत्त्वावर चालत भाजपने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने जोरदार तयारी सुरू केली आहे.

भाजपच्या संघटनात्मक बांधणीचा



हा टप्पा महाराष्ट्राच्या सर्व भागांतील राजकीय ताकद दृढ करण्याच्या दृष्टीने निर्णायक ठरत आहे. संपूर्ण राज्यभर १२२१ मंडळे गठीत करण्यात आली आहेत. त्यापैकी ९६३ मंडळांची रचना जाहीर करण्यात आली असून यातील २५८ मंडळे नव्याने स्थापन केली गेली आहेत.

**एकूण विभागवार मंडळे**

कोकण-ठाणे : १८४ मंडळे
उत्तर महाराष्ट्र : १८४ मंडळे
पश्चिम महाराष्ट्र : २२२ मंडळे
विदर्भ : ३१३ मंडळे
मराठवाडा : २०७ मंडळे
मुंबई : १११ मंडळे

या संपूर्ण नियुक्त्या केवळ आकडेवारी नाही, तर पक्षाची जनाधारावर आधारित शक्ती वाढवण्याचा प्रयत्न आहे. यातून भाजपच्या कार्यपद्धतीतील शिस्त, संघटन आणि वेळेचे भान प्रकर्षाने अधोरेखित होते. आगामी निवडणुकीसाठी एका संघटित आणि समर्पित कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. भाजपची रणनीती आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहचवण्याचा आणि सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधण्याचा ध्यास घेत आहे.

# पक्ष संघटनेने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे बजवा -आमदार प्रशांत ठाकूर

## नवनियुक्त भाजप मंडळ अध्यक्षांचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या संघटन पर्व अंतर्गत पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या तसेच पक्ष संघटनेने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे बजवावी, असे आवाहन केले.



(अधिक छायाचित्रे पान ४वर..)

पनवेल विधानसभा मतदारसंघातील नेरे मंडळ अध्यक्षपदी भूपेंद्र पाटील, तळोजा मंडळ अध्यक्षपदी दिनेश खानावकर, नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे, खारघर मंडळ अध्यक्षपदी प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्षपदी सुमित झुंझारराव, कळंबोली मंडळ अध्यक्षपदी अमर पाटील, कामोठे मंडळ अध्यक्षपदी विकास घरत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यासह उरण विधानसभा मतदारसंघातील उलवे मंडळ अध्यक्षपदी नियुक्ती झालेले रूपेश धुमाळ व कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांची सोमवारी (दि. २१) पनवेल येथे भेट घेतली.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्ष सध्या संपूर्ण देशभरात संघटनात्मक बळकटीसाठी मंडळ अध्यक्षांच्या नियुक्त्या करीत आहे. ही प्रक्रिया विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये सुरू आहे. भाजपने मंडळ आणि जिल्हा अध्यक्षांच्या नियुक्तीसाठी वयोमर्यादा निश्चित केली आहे. मंडळ अध्यक्षांसाठी वयोमर्यादा ३५ ते ४५ वर्षे, तर जिल्हाध्यक्षांसाठी ४५ ते ६० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. ही पावले पक्षात तरुण नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि संघटनात्मक कार्यक्षमता वाढवण्यासाठी उचलण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने तालुका मंडळ अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्ष संघटनेला बळ देण्याचे काम केले आहे. काल राज्यात एकाच वेळेला आठशेपेक्षा जास्त मंडळ अध्यक्षाची नियुक्ती झाली आहे. ही सर्व तरुण टीम जोडली गेली आहे. आपला पक्ष अधिकाधिक ताकदवान होत चालला आहे. नवनियुक्त तालुका मंडळ अध्यक्षांवर त्या-त्या मंडळाची जबाबदारी आहे आणि पक्ष संघटनेच्या दृष्टिकोनातून ते जबाबदारीने काम करतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त करीत संघटनेने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध काम करा, अशी सूचनाही केली.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, नरेश गायकवाड, प्रभाकर बहिरा, कळंबोली माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, विजय पाटील, कृष्णा पाटील, सतिश पाटील, प्रकाश खैरे, रूपेश नागवेकर, केदार भगत, किशोर चौतमोल, रोनक शेट्ये, प्रशांत शेट्ये, भीमराव पोवार, प्रवीण मोरबाळे, संदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणाचा निकाल जाहीर

## मुख्य आरोपी अभय कुरुंदकरला जन्मठेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे यांच्या हत्या प्रकरणात पनवेल सत्र न्यायालयाने मुख्य आरोपी बडतर्फ वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरला जन्मठेपेची शिक्षा आणि २० हजारांचा दंड सुनावली आहे. याशिवाय कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर या कुरुंदकरच्या दोन साथीदारांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.



कोल्हापूर जिल्ह्यातील आळते (ता. हातकणंगले) येथील अश्विनी बिद्रे यांची २०१५मध्ये पनवेलजवळील कळंबोली पोलीस ठाण्यात बदली झाली होती, मात्र त्या कळंबोली पोलीस ठाण्यात रूजू झाल्याच नाही. दीड वर्षापासून त्या बेपत्ता होत्या. भाईंदरच्या नवघर पोलीस ठाण्याचा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकर याचे अश्विनी बिद्रेंसोबत प्रेमसंबंध होते. दोघेही विवाहित होते. अश्विनी यांनी लग्नासाठी तगादा लावल्याने कुरुंदकर याने त्यांची ११ एप्रिल २०१६ रोजी हत्या करून साथादीरांच्या मदतीने मृतदेहाचे तुकडे वसई खाडीत फेकून विल्हेवाट लावली.

अश्विनी बिद्रे यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. नऊ वर्षानंतर या प्रकरणाचा निकाल लागला आहे. पनवेल सत्र न्यायालयाचे न्यायाधीश के.जी. पालदेवार यांनी सोमवारी (दि. २१) आरोपींना शिक्षा सुनावली.

## चंद्रपूरचा पारा ४५.६ अंशावर

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

राज्यातील तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. उष्ण शहर म्हणून ओळख असलेल्या चंद्रपूरमध्ये ४५.६ अंश सेल्सियस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे.

दरवर्षी मे जून महिन्यात प्रचंड कडक उन्हाळा जाणवतो. यंदा मात्र एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासूनच सूर्य आग ओकत आहे. सोमवारी (दि. २१) चंद्रपूरच्या तापमानात वाढ होऊन होऊन ४५.६ अंशाची नोंद करण्यात आली. यंदाचे हे उच्चांकी तापमान आहे.

## निवडक

### सोन्याच्या दराने एक लाखांचा टप्पा केला पार

**मुंबई :** मागील काही दिवसांत सतत वाढणाऱ्या सोन्याच्या दराने सोमवारी (दि. २१) प्रतितोळा एक लाखांचा टप्पा पार केला. सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या आर्थिक अस्थिरतेमुळे सोन्याच्या दरात मोठी उसळी पहायला मिळत आहे. दरम्यान, येत्या ३० एप्रिलला अक्षय तृतीया असून हा साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मुहूर्त समजला जातो. यादिवशी सोन्याचा भाव एक लाखांचा टप्पा ओलांडेल असा अंदाज होता, मात्र त्यापूर्वीच सोन्याच्या भावाने जीएसटीसह लाखाचा टप्पा पार केला आहे.

### ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचे निधन

**व्हॅटिकन सिटी :** गेल्या काही काळापासून



आजारपणाशी झुंजत असलेले ख्रिस्ती धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचे सोमवारी (दि. २१) निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. प्रकृतीच्या समस्यांचा सामना करीत असलेल्या पोप फ्रान्सिस यांनी व्हॅटिकस सिटी येथे अखेरचा श्वास घेतला.

### खंडाळा घाटात भरधाव ट्रकची पाच वाहनांना धडक

## तिघांचा मृत्यू, ११ जण जखमी





**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटातील वाघजाई देवी मंदिराजवळ एक माल वाहतूक ट्रक अनियंत्रित होऊन त्याने खोपोली बाजूकडून लोणावळ्याकडे जाणाऱ्या पाच वाहनांना धडक दिली. या अपघातात तीन जणांचा मृत्यू, तर ११ जण जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात रविवारी (दि. २०) रात्री १०.१५च्या सुमारास घडला.

भरधाव ट्रकने रिक्षा, इनोव्हा कार, इर्टिका, टाटा पंच व आयआरबी कंपनीचे दुरूस्ती वाहन यांना धडक दिली. या अपघातात निलेश लगड (वय ४२), श्राव्या निलेश लगड (वय १२, रा. पुणे) आणि प्रिया सागर इंदुलकर (वय ३४) यांचा मृत्यू झाला. यापैकी निलेश व श्राव्या हे बाप-लेक असून ते कुटुंबासह अलिबाग येथून सहलीवरून घरी परतत असताना काळाने दोघांवर घाला घातला. जखमींवर लोणावळा, खंडाळा, खोपोली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बोरघाट व खंडाळा पोलीस, आपत्कालीन यंत्रण तसेच अपघातग्रस्त टीमने घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले तसेच अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

अपघातास कारणीभूत ठरलेला ट्रकचालक फरार झाला आहे. त्याचा लोणावळा पोलीस शोध घेत आहेत तसेच ट्रकचे ब्रेक फेल झाले की चालकाच्या चुकीमुळे हा अपघात घडला याचाही तपास सुरू आहे.

# सततच्या पराभवामुळे राहुल गांधींच्या मनावर परिणाम

### मुख्यमंत्र्यांचा टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी परदेशात जाऊन भारताच्या लोकशाहीची बदनामी करीत आहेत. वारंवार निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे ते विचलित झाले असून त्यांच्या मनावर परिणाम झाला आहे. त्यांनी जनतेमधून जाऊन विश्वास संपादन केला पाहिजे, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २१) पत्रकारांशी बोलताना दिला.



मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, भारताची, भारतीय लोकशाहीची, भारतीय संविधानाने तयार केलेल्या संस्थांची राहुल गांधी बदनामी करीत आहेत. परदेशात जाऊन भारताची बदनामी करणे निंदनीय आहे. सतत झालेल्या निवडणुकीतील पराभवामुळे हा परिणाम असून राहुल गांधी विदेशात जाऊन आपल्या देशाबाबत खोटं बोलत आहेत. वारंवार निवडणुका हरल्याने त्यांच्या मनावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. खरा देशभक्त विदेशात जाऊन देशाची बदनामी करणार नाही. माझा त्यांना सल्ला आहे की, त्यांनी जनतेत जाऊन काम केले पाहिजे. जगभरात बदनामी करून त्यांची मते वाढणार नाहीत. जनतेची विश्वासार्हता मिळवली तरच त्यांची मते वाढतील. परदेशात भारताची बदनामी करून ते निवडणुका जिंकू शकत नाहीत. उलट त्यांचीच उंची कमी होऊ शकते.

राहुल गांधी विरोधी पक्षनेते असताना सातत्याने देशाची बदनामी करीत आहेत. त्यामुळे संशय निर्माण होत आहे की, ते नेमका कुणाचा अजेंडा चालवत आहेत. हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली विधानसभा निवडणुका ते हारले आणि आता ते मतदान प्रक्रियेवर आणि मतदार यादीवर प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत. अतिशय बाळबोधपणाचा हा प्रकार आहे. त्यामुळे त्यांनी जनतेत जाऊन भारताची बदनामी करणे बंद करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

# लाडकी बहीण योजनेचा सातवा हप्ता एप्रिल महिना संपण्याच्या आधी मिळणार

### मंत्री आदिती तटकरेंची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता केव्हा येणार याकडे सर्व पात्र महिलांचे लक्ष लागलेले आहे. या संदर्भात महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी (दि. २१) प्रसारमाध्यमांशी बोलताना माहिती दिली.

जुलै महिन्यापासून राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत अडीच लाखांच्या आत उत्पन्न असलेल्या महाराष्ट्रातील महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. सध्याच्या घडीला राज्यात दोन कोटी ४७ लाख महिला या योजनेसाठी पात्र आहेत. जुलैपासून सहा हप्ते पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. आता सातव्या हप्त्याची प्रतीक्षा आहे.

माध्यमांशी संवाद साधताना महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, एप्रिल महिना संपण्याच्या आधी पात्र महिलांच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ वितरीत केला जाणार आहे. ना. तटकरे यांनी या वेळी कोणतीही थेट तारीख दिली नसली तरी काही वृत्तांनुसार अक्षय तृतीयेला हा निधी वितरीत केला जाऊ शकतो.

दरम्यान, या योजनेतील पात्र महिलांच्या अर्जांच्या छाननी प्रक्रियेविषयी विचारण्यात आले तेव्हा आदिती तटकरे म्हणाल्या, सुरुवातीपासून या योजनेसंदर्भात फार गैरसमज पसरवले गेले आहेत. अडीच लाखांचे उत्पन्न असलेल्यांनाच हा लाभ मिळणार आहे. त्यात नवे काही नाही. लाडकी बहीण योजनेच्या शासननिर्णयात हेच नमूद आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये पारितोषिक वितरण, सामाजिक संमेलन उत्साहात

### मान्यवरांची उपस्थिती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रविवारी (दि. २०) वार्षिक पारितोषिक वितरण आणि सामाजिक संमेलन मोठ्या उत्साहात झाले. त्याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते झाले.





कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेच्या प्रांगणात रंगीलो भारत : भारताच्या शाश्वत आत्म्याचा उत्सव या आकर्षक संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विद्यार्थ्यांनी आपल्या सांस्कृतिक विविधतेचे आणि एकतेचे दर्शन घडवले.

संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, शकुंतला ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुरवे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, अर्चना ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, नरेश ठाकूर, अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, माजी नगरसेवक आरती नवघरे, नेत्रा पाटील तसेच कीर्ती नवघरे, किरण पाटील, दीपक शिंदे, अमर उपाध्याय, नितेश पाटील, प्रवीण बेरा, स्वप्नील ठाकूर, अमोघ ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक, विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

या वेळी नर्सरीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य, लोकगीते, नाट्यछटा आणि संगीत यांच्या माध्यमातून भारतातील विविध राज्यांची संस्कृती रंगमंचावर साकारली. सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच शैक्षणिक, क्रीडा व सहशालेय उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३३ गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये १५ जणांनी आयआयटी, सात जणांनी एमबीबीएस, तीन जणांनी बीडीएस आणि एक विद्यार्थ्याने नॅशनल डिफेन्स अकॅडमीमार्फत भारतीय हवाई दलात प्रवेश मिळवला आहे. याशिवाय सात क्रीडापटूंनी सीबीएससी राष्ट्रीय स्पर्धा, राज्यस्तरीय ॲथलेटिक्स व तलवारबाजी चॅम्पियनशिपमध्ये यश मिळवले आहे. सर्व गुणवंतांना प्रत्येकी १० हजार रोख आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगवण्याची जबाबदारी समाजाची -मुख्यमंत्री फडणवीस

**पुणे : प्रतिनिधी**

पाश्चिमात्य संकृती ही ज्याच्याकडे शक्ती आहे तो जगेल असे म्हणते. भारतीय संस्कृती मात्र, जो जन्माला आला आहे तो जगेल आणि समाज त्याला जगवेल असे सांगते. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगविण्याची जबाबदारी ही समाजाची आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्र, पुणे आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी आयोजित दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविण्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र प्रदान सोहळा भांडारकर संस्था लॉ कॉलेज रोड येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विकलांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष दत्तात्रय चितळे, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, केंद्राचे विश्वस्त व प्रमुख विनय खटावकर, सचिव राजेंद्र जोग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सदस्य राजेश पांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, भारत विकास परिषद आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीने अत्यंत नियोजनबद्ध व्यवस्था करून आणि सेवा आणि समर्पण हा भाव ठेऊन दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा एक नवीन जागतिक विक्रम तयार केला. सेवेचाच भाव ठेऊन काम करणाऱ्यांसाठी विक्रम बनवावा लागत नाही तर तो एक विसावा असून हा प्रवास कधीच थांबत नाही. हा विक्रम पुन्हा हीच संस्था मोडेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने या केंद्राचे नाव दिव्यांग पुनर्वसन केंद्र करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गेल्या काही वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिव्यांगांच्या संदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विशेषतः आर्टिफिशियल लिम्ब्ज मनुफॅक्चरिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया (अलिम्को) स्थापन केल्यामुळे पूर्वी जे अत्याधुनिक कृत्रिम अवयव (प्रोस्थेटिक पार्ट्स) आयात करावे लागत होते; ते तयार करण्याचे तंत्रज्ञान भारतात आणल्याने जागतिक गुणवत्तेचे कृत्रिम अवयव आपल्या देशात तयार होत आहेत. मोठ्या ग्रामीण भागातील लोकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचले पाहिजे यासाठी केंद्र सरकारने योजना सुरू केली असून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे, राज्यातील शासकीय कार्यालये, संकेतस्थळे या सर्व ठिकाणी सुगमता आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. १०० दिवसांच्या कार्य आराखड्यामध्ये दिव्यांगांकरिता सुगमता निर्माण करणे हेदेखील लक्ष्य दिले आहे, अशी माहिती देखील फडणवीस यांनी दिली.

विकलांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष दत्तात्रय चितळे यांनी या विक्रमात दिव्यांगांना ८ तासात ८९२ अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त कृत्रिम हात, पाय अवयव बसविण्यात आले. संस्थेला या कार्यासाठी आर्थिक मदतीसाठी मोठ्या प्रमाणात दानशूर व्यक्ती, संस्था पुढे येतात. सेवेतून चांगले संस्कार व्हावेत यासाठी प्रयत्न असतो, असे सांगितले

## मोर्बा ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांचा शुभारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायत हद्दीतील रस्ते, सामाजिक सभागृह, गटारे, मोर्बा गावच्या प्रवेशद्वारची कमानी अशी जवळपास दिड कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा उदघाटन व भूमिपूजन समारंभ रविवार दि. २० एप्रिल रोजी खासदार सुनील तटकरे यांच्याहस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना खा.तटकरे यांनी विकास कामांबाबत नेहमीच आपण मोर्बा विभागाला झुकते माप दिले असल्याचे सांगितले.



सदर कार्यक्रमास रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,तालुकाध्यक्ष काका नवगणे, जिल्हा युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, जेष्ठ नेते हुसेन राहटविलकर, पक्षाचे श्रीवर्धन मतदार संघ अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष अल्ताफ धनसे, मोर्बा ग्रामपंचायत सरपंच शौकत रोहेकर ,तालुका राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष राजू मोरे,नजीर धनसे, माजी उपसरपंच इकबाल हर्णे कर,हनीफ राऊत, झुल्फिकार राऊत,आसिफ राऊत,योगेश गुगले,विभागातील विविध गावचे सरपंच,पक्षाचे कार्यकर्ते,मोर्बा ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

यावेळी खा.सुनील तटकरे आपल्या मार्गदर्शनात बोलताना पुढे म्हणाले कि, लोकसभा व विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर नाम्यात विविध विकास कामांचा उल्लेख करण्यात आला होता. त्या विकास कामांची वचनपूर्ती केल्याचा आनंद माझ्यासारख्या कार्यकर्त्याला निश्चितच होत आहे. मोर्बेकर वेगवेगळ्या निवडणुकीच्या माध्यमातून मी असेन,अदिती असेल आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहेत. याची जाणीव आम्हाला निश्चितच असून हे ऋण आम्ही कदापी विसरणार नाही.

मोर्बा गावासह विभागातील विविध विकास कामे गेली अनेक वर्षात आपण केली असून प्रलंबित विकास कामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील. या विकासकामांबरोबरच व्यक्तिगत योजनांचा लाभ देण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. अदितीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करून या योजनेचा लाभ मोर्बा गावातील अनेक महिलांना निश्चितच मिळाला असेल.

## झाडांवर विद्युत रोषणाई; बेलापूर येथील हॉटेल मालकाला १० हजार दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रात वृक्षांवर खिळे ठोकून जाहिराती करण्यात येत असल्याचे तसेच काही वृक्षांवर विद्युत रोषणाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत असल्याने अशाप्रकारे कृत्य करून वृक्षांना तसेच पर्यावरणाला हानी पोहोचवू नये असे आवाहन नमुंमपा वृक्ष प्राधिकरणाच्या वतीने वारंवार करण्यात येत असते.

बेलापूर सेक्टर ३ येथील पवन रेस्टॉरंट आणि बार बाहेरील झाडांवर विद्युत रोषणाई केली असल्याचे आढळून आल्याने भरारी पथकाने बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे यांच्या नियंत्रणाखाली, उद्यान विभाग परिमंडळ १चे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली रू. १० हजार दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे.



सर्वच विभागीय कार्यक्षेत्रात याबाबतची विशेष मोहीम राबविली जाणार असून नागरिकांनी व्यावसायिकांनी झाडांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई करणे अशा प्रकारचे वृक्षांना धोका पोहचविणारे कृत्य करू नये, असे आवाहन आहे.

## महाडमध्ये भरदुपारी वॅगन आर कार चोरली

**महाड: प्रतिनिधी**

गांधारी पुलाजवळ असलेल्या सय्यद मोटर मधून भर दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात चोराने वॅगनआर कार चोरून नेली. या बाबत सय्यद यांनी तासाभराने पोलिस ठाणे गाठून खबर दिली मात्र ३६ तास उलटून गेले तरी पोलिसांना कारचा छडा लावण्यात अपयश आले आहे.

महाड शहराजवळ सय्यद मोटर नावाने जुन्या कार विक्री करण्याचा व्यवसाय इम्रान सय्यद गेली अनेक वर्षे करत आहेत. शुक्रवारी दुपारी एका अज्ञात व्यक्तीने याठिकाणी येऊन कोणी नसल्याचे पाहून कार घेऊन पळ काढला. वॅगन आर क्रमांक एम. एच. ४३ ए टी ८९६३ ही इम्रान सय्यद यांनी पनवेल येथून विक्रीला आणली होती.

याबाबत इम्रान सय्यद यांनी तत्काळ पोलिस ठाण्यात धाव घेऊन याबाबत तक्रार दिली. कार चोरीला जावून सुमारे ३६ तास उलटले तरी अद्याप शोध लावलेला नाही.

## तक्रार केल्याने नेरळमध्ये तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला

**नेरळ : प्रतिनिधी**

मित्राच्या विरोधात तक्रार केली म्हणून तरुणावर कोयत्याचा प्राणघातक हल्ला चढविण्यात आल्याची घटना नेरळ पोलीस ठाणे हद्दीत घडली. सुमित कमलेश गायकवाड या तरुणावर आरोपी अभिषेक उर्फ बच्चू देविदास जोंधळे याने हा प्राणघातक हल्ला केला.सुदैवाने स्थानिक तरुण हजर झाल्याने पुढील मोठी दुर्घटना होता टळली.जखमी सुमित यांस रायगड हॉस्पिटल भिवपुरी येथे तात्काळ उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



रविवार २० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास २१ वर्षीय तरुण सुमित गायकवाड हा नेरळ मोहाची वाडी येथील आपल्या घराच्या मागील पाण्याच्या टाकी खाली मोबाईलवर बोलत होता.या दरम्यान वाडीतील अभिषेक उर्फ बच्चू देविदास जोंधळे हा तरुण तिथे आला असता या दोघांमध्ये मागील भांडणाच्या किरकोळ वाद झाला होता.मित्राच्या विरोधात नेरळ पोलीस ठाण्यात केलेली तक्रार या वादाची याला किनार होती. माझ्या मित्राच्या विरोधात तक्रार करतो का म्हणून अभिषेक जोंधळे याने सोबत आणलेला धारधार कोयत्याचा प्रथम हल्ला हा सुमितच्या पाठीवर त्यानंतर हातावर करीत सुमितला गंभीर जखमी केले

यावेळी पुढील वार सुमितने चुकवला तर त्यावर दगडाचा हल्ला देखील अभिषेकने केला यावेळी स्थानिक तरुण मदतीसाठी धावल्याने पुढील मोठा अनर्थ टळला मात्र जखमी झालेल्या सुमितला भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटल मध्ये तात्काळ उपचारासाठी दाखल करण्यात आले.यावेळी मोहाचीवाडी येथील ग्रामस्थ जमा झाले होते.सुरक्षितेच्या दृष्टीने नेरळ पोलीसांनी तात्काळ हजर होत गुन्हा दाखल केला

सुमित सोबत सुरुवातीला वाद झालेले दोन अल्पवयीन मुले यांच्यात १४ एप्रिलच्या बाबसाहेब आंबेडकर जयंती दिनी नाचण्यावरून वाद झाला होता.यांच्या विरोधात तक्रार नेरळ पोलीस ठाण्यात देण्यात आली होती या अल्पवयीन मुलांच्या खिशात पोलिसांना अंमली पदार्थ देखील सापडून आले होते.

## सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या औचित्याने अधिनियमाच्या जनजागृतीसाठी २८ एप्रिल हा दिवस जिल्हा व ग्रामस्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन सेवा हक्क दिन साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार, तहसिलदार शितल रसाळ, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी निलेश लांडगे तसेच जिल्हाधिकारी शासकीय विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

राज्यातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक गतीमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरिता २८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंमलात आला आहे. या अधिनियमांतर्गत ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्यापैकी ५३६ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत.

अधिनियमाचा प्रभावी वापर झाल्यास नागरिकांचे जीवन सुकर करण्यास मदत होईल. अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घरपोच सेवा देणारा सेवादूत उपक्रम, ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रामार्फत शासनाच्या सर्व विभागांच्या अधिसूचित सेवा उपलब्ध करुन देणे, सर्व शासकीय कार्यालयांत व आपले सरकार केंद्रांवर सेवा शुल्क व कालमर्यादा यांची माहिती देणारे व तक्रार नोंदविणेसाठी क्यू आर कोड उपलब्ध करुन देणे, आपले सरकार सेवा केंद्र सुरु करणे, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे आदी उपक्रम जिल्ह्यांमध्ये राबवावेत

सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्याची प्रभावी अंमलबजावणी करावी अशा सूचना देऊन सर्व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवणे म्हणजेच खऱ्या अर्थाने नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.

## सुरक्षा ठेवींची अतिरिक्त रक्कम भरण्याचे वीजग्राहकांना आवाहन

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणच्या कल्याण परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल अथवा मे महिन्याच्या वीजबिलांसोबत सुरक्षा ठेवीची अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्यास कमाल सहा समान मासिक हप्त्यांची सोय ग्राहकांना उपलब्ध आहे. त्याबाबतचा संदेश सुरक्षा ठेवीच्या बिलावर नमूद करण्यात आला आहे. या सुरक्षा ठेवीच्या अतिरिक्त रकमेचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणकडून ग्राहकांना करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता २०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीज ग्राहकांना सुरक्षा ठेव आकारण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गणना करण्यात येते व त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीजवापराच्या आधारे नवीन सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित करण्यात येते. वीजग्राहकांची सुरक्षा ठेव मासिक बिल असेल तर तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद आयोगाकडून करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विनियम १३.११ नुसार ग्राहकाने भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दराच्या सममूल्य दराने व्याजाची रक्कम वीजबिलाद्वारे समायोजित करून वीजग्राहकांना अदा करण्यात येते.

## महाराष्ट्र दिनाची आढावा बैठक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

१ मे, महाराष्ट्र स्थापना दिनाच्या अनुषंगाने पूर्व तयारीची बैठक अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शहा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कोकण भवनातील पहिला मजला समिती सभागृह येथे झालेल्या या बैठकीत कोकण विभागातील विविध कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त विभागीय स्तरावरील मुख्य शासकीय ध्वजारोहण १ मे, २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता कळंबोली सेक्टर–१७ येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार असून. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्रीमती शहा यांनी कोकण भवनातील सर्व शासकीय यंत्रणांनी हा सोहळा शासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन यशस्वीरित्या साजरा करण्याबाबत सूचना दिल्या.

प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहावे, असेही त्यांनी या वेळी सांगितले.



## यशवंती हायकर्स आणि खोपोली नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने बोरघाट स्वच्छता अभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

बोरघाट संवर्धन मोहीम अंतर्गत दि. २३ फेब्रुवारी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त 'यशवंती हायकर्स खोपोली' आणि 'खोपोली नगरपरिषद' यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली शहराचा मानबिंदू असलेला 'बोरघाट स्वच्छता अभियान' सुरू करण्यात आले आहे. सदर अभियानाचा 'दुसरा टप्पा' रविवार( दि. १९) रोजी झाला.

दुसऱ्या टप्प्यात सुध्दा ट्रॅक्टरची एक ट्रॉली भरुन कचरा गोळा करण्यात आला. जमा केलेल्या कचर्या मध्ये प्लॅस्टिक च्या पाण्याच्या बाटल्या, दारुच्या रिकाम्या बाटल्या, प्लॅस्टिक पिशव्या, पॅकिंग साठी वापरण्यात येणारे प्लॅस्टिक आणि कुरकुरे सारख्या पदार्थांची पाकिटे यांची संख्या जास्त आहे.




बोरघाट स्वच्छता अभियानात यशवंती हायकर्स खोपोली चे संस्थापक सदस्य व माजी अध्यक्ष पद्माकर गायकवाड , यशवंती अध्यक्ष मच्छिंद्र यादव, ज्येष्ठ सदस्य सगळगीळे, अरविंद पाटील, प्रणित गावंड, अभिजित घरत, अभिजित देशमुख, सचिन पवार, मुकेश गायकवाड, मयुरेश उंबरे, शुभम पाटील यांनी सहभाग घेतला तर खोपोली नगरपरिषदेचे पी सी सोलंकी आणि त्यांचे सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली दुसरा टप्पा यशस्वी झाला.लवकरच 'बोरघाट स्वच्छता अभियानाच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात येईल असे अध्यक्ष मच्छिंद्र यादव यांनी सांगितले.


## दुखवटा

### महादेव पाटील



**उरण :** पाणदिवे गावातील सामाजिक कार्यकर्ते महादेव कृष्णा पाटील (वय ७९) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन विवाहित मुलगे ,सुना ,नातवंडे असा मोठा त्यांचा परिवार आहे . महादेव पाटील यांचा दशक्रिया विधी सोमवार २८ एप्रिललाला माणकेश्वर, तर उत्तरक्रिया २९ एप्रिल ला पाणदिवे, उरण येथे होणार आहे.

### सी.बी. लिगाडे



**नवी मुंबई :** जेष्ठ पत्रकार सी. बी. लिगाडे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवारी रात्री दुःखद निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते विद्या प्रसारक हायस्कूल, बेलापूर येथे शिक्षक म्हणून ३५ वर्ष कार्यरत होते. २५ वर्षाहून अधिक काळ नवी मुंबईतून विविध दैनिक वर्तमान पत्रातून पत्रकारिता करीत होते. . त्यांची जाहीर शोकसभा बेलापूरगांव येथे मंगळवारी, २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.

# भटके श्वान, मांजरांचे निर्बीजीकरण

## पनवेल महापालिकेचा उपक्रम





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल पालिकाक्षेत्रात या आधी भटक्या कुत्र्यांची आणि मांजरांची दहशत मोठ्या प्रमाणात बघायला मिळत होती. पनवेल पालिका प्रशासनाकडून युद्ध पातळीवर हालचाल सुरू करून निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. एजन्सी नेमण्यात आल्यानंतर कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यावर आतापर्यंत १२ हजारांच्या आसपास कुत्र्यांची दहशत मोठ्या प्रमाणात कमी झाली असून कुत्र्यांबरोबरच ७०० मांजरांचे निर्बीजीकरण केल्यामुळे वयोवृद्ध तसेच लहान मुलांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले.

पनवेल परिसराचे नागरिकरण मोठ्या प्रमाणात वाढत असून सिडकोचा मोठा परिसरात या महसुली विभागात येतो. पूर्वी घर आणि शेतीचे राखण करण्यासाठी प्रत्येक घरी कुत्रे पाळले जायचे. हा प्राणी अतिशय प्रामाणिक असून तो रखवालदाराची भूमिका पार पाडीत असे, मात्र नागरीकरणाचा कक्षा रूंदावल्याने शेती व्यवसाय जवळपास नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. परिणामी, आता कुत्रे पाळण्याचा कलही कमी झाला आहे.

दिवसेंदिवस भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत चालली असून त्यांचे निर्बीजीकरण होताना दिसत नव्हते. शहरी भागाचा विचार करता नवीन पनवेल, कळंबोली, खांदा वसाहत, कामोठे, खारघर या नोडमध्ये मध्यंतरी नसबंदीचे काम बंद पडले होते. या आधी हजारो कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले, असा दावा सिडको करीत असली तरी रस्त्यावरील कुत्र्यांची दहशत कमी झालेली नव्हती.

सर्वात धोकादायक आणि दहशतीचे वातावरण होते ते म्हणजे पनवेल शहरात. काही वर्षांपूर्वी न्यायालयाच्या पाठीमागे असलेल्या जागेवर निर्बीजीकरणाकरिता निवारा उभारण्यात आला होता. याकरिता खासगी एजन्सी नियुक्त करण्यात आली होती, मात्र ही एजन्सी आपला गाशा गुंडाळून गेली. दरवाजे, खिडक्या आणि छप्परसुध्दा ते बरोबर घेऊन गेले. आता निर्बीजीकरण करण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्यात आली असून भटक्या श्वानांवर पालिकेचे बारीक लक्ष असल्याचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांनी सांगितले.

एक भटका कुत्रा पकडण्यासाठी साधारणतः चार माणसे आवश्यक असतात. रात्री कुत्रे जास्त प्रमाणात रस्त्यावर दिसतात, परंतु त्यावेळी ती अंधारात सहज पळून जात असल्याने त्यांना पकडणे सोपे नसते. समजा एखादा कुत्रा पकडून गाडीत टाकला तर तो भुंकून भुंकून सर्वांना हैराण करतो आणि रात्रीच्या वेळी हे नागरिकांना निश्चित असह्य होईल. म्हणून दिवसा कुत्रे पकडले जातात. तिथेही खूप गोष्टी आहेत. कुत्र्यांची घ्राणेंद्रिये अत्यंत तीक्ष्ण असतात. जी माणसे कुत्रा पकडायला येतात त्यांच्या अंगाला एक विशिष्ट वास येतो. ते तो ओळखतात आणि पळ काढतात. एखाद्या गल्लीतल्या पंधरा-वीस कुत्र्यांपैकी दोन-चार पकडली जातात. वारंवार तिथे गेले तर कुत्रे अधिक सावध होतात.

# आदई सर्कलजवळ वाहतूक कोंडी

**पनवेल : वार्ताहर**



आदई सर्कल येथे रस्त्यांवर अनधिकृत बसेस आणि मोठी वाहने पार्किंग होत असल्याने सकाळ-संध्याकाळी येथे नेहमीच वाहतूक कोंडी पाहावयास मिळते. अनधिकृत पार्किंगवर नित्याची कारवाई होत नसल्याने त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे.

नवीन पनवेल शहरातील आदई सर्कलजवळील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर बेकायदा बसेस उभ्या असतात. रस्त्यावर बसेसची उभी लांब रांग लागते. या ठिकाणी रस्त्यांची कामे संथ गतीने सुरू आहेत. सुकापुरकडून पनवेलच्या दिशेने येताना रस्ता खराब आहे. येथील खड्डे बुजवले गेले नाहीत. त्यामुळे वाहनांचा वेग मंदावतो आणि वाहतूक कोंडी होते. वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मुख्य गेटच्या बाजूला रस्त्यांवर बसेसची रांग लागते तसेच फूडच्यादेखील अनधिकृत गाड्या लागतात. यावर वाहतूक विभाग आणि पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

संध्याकाळी आणि दुपारच्या सुमारास येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झालेली दिसून येते. त्यामुळे वाहनचालक आणि प्रवाशांचा तासभर वाया जातो. आपले वाहन या कोंडीतून कसे बाहेर काढायचे, असा यक्षप्रश्न वाहनचालकांना पडल्याशिवाय राहत नाही. आदई सर्कलजवळील वाहतूक कोंडीतून वाहन काढताना कित्येकदा वाहने एकमेकांना घासली जातात. त्यातून वाद उद्भवतात. कंट्रोलला फोन केल्यानंतर काही वेळाने याठिकाणी पोलीस येतात, मात्र नित्याची वाहतूक कोंडी होत असतानादेखील वाहतूक पोलीस दुसरीकडे दुचाकीचालकांवर कारवाई करताना दिसून येतात. याबाबत वाहतूक पोलिसांना विचारले असता आम्ही येथील अनधिकृत पार्किंगवर कारवाई करत असल्याचे सांगितले.

# भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**






भाजपच्या नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. यानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी दशरथ म्हात्रे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, दशरथ म्हात्रे यांची निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, दीपक बेहरे, भाजपनेते प्रल्हाद केणी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, नेरे मंडल अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, माजी उपमहापौर सिताताई पाटील, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, अॅड.मनोज भुजबळ, समीर ठाकूर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, संदीप पाटील, जगदीश घरत, भमिराव पोवार, युवामोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, किशोर चौतमोल, मोतीलाल कोळी, भुषण गायकवाड, शांताराम महाडीक, गोपीनाथ मुंडे, संजोत शेळके, शशिकांत शेळके, जितेंद्र वाघमारे, जगदीश घरत, संजय कांबळे, अभिषेक भोपी, विवेक होन, अक्षय सिंग, रोहीत कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.







**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अमरीश मोकल, मयुरेश नेतकर, विनायक मुंबईकर, केदार भगत, प्रवीण मोहकर, रूपेश नागवेकर आदी उपस्थित होते.**







**पनवेल : तालुक्यातील बोनशेत येथे श्री विठ्ठल रखुमाई प्रासादिक भारुड मंडळाच्या वतीने श्री विठ्ठल रखुमाई उत्सव व सत्संग सोहळा दोन दिवस आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजप नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, जोमा फडके, गणेश फडके, कान्हा फडके, अनंता फडके, हरिश्चंद्र फडके, सुनील फडके, धोंडू फडके, ज्ञानेश्वर फडके आदी उपस्थित होते. दरम्यान, भाजप नेरे मंडळ अध्यक्षपदी भूपेंद्र पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.**

## पनवेल महापालिकेकडून लोकशाही दिनाचे आवाहन

**पनवेल :** महापालिकेमार्फत आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार किंवा या दिवशी सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी नागरिकांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील तसेच तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.



**उरण : भाजप तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्षपदी पिरकोन गावचे धनेश गावंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी अभिनंदन केले. या वेळी तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, पंडित घरत, पिरकोन ओबीसी सेल अध्यक्ष महेश गावंड आदी उपस्थित होते.**

# जसखारच्या रत्नेश्वरी देवीची पालखी यात्रा

**उरण : वार्ताहर**

उरण परिसरातील सर्वात मोठी व सलग तीन दिवस चालणाऱ्या जसखार येथील श्री रत्नेश्वरी देवीयात्रा-पालखी सोहळ्याला सोमवार (दि.२१) पासुन सुरुवात झाली असून भक्तांच्या हाकेला धावणारी, नवसाला पावणारी आणि भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी देवी म्हणून येथील पंचक्रोशीत ख्याती असलेली जसखारची रत्नेश्वरी देवी होय.

आख्यायिकेनुसार सुमारे दिडशतकापुर्वी गावातील भगवती देवीच्या एका निस्सीम भक्ताला स्वप्नात दिव्य स्त्री दिसली. त्या दिव्य स्त्रीने सांगितले की, मी तळ्यात येऊन बसली आहे. तिने भक्ताला दृष्टांतात सांगितले की, मला तळ्यातुन बाहेर काढ. गावात स्थान दे, मी तुमचे कल्याण करीन. दुसऱ्या दिवशी भक्ताने ग्रामस्थांना स्वप्नातील दृष्टातांची हकिकत सांगितली. ग्रामस्थांनी विश्वास ठेऊन तळ्यात शोध घेतला. शोध घेताना तळ्यात रत्नासारखी तेज असलेली चमचमणारी पाषाणी देवीची मूर्ती सापडली. ग्रामस्थांनी रत्नासारख्या तेजाची आभा असलेल्या देवीचे रत्नेश्वरी नामकरण केले. कौलारु छोटेखानी मंदिर बांधुन ग्रामस्थांनी देवीची मनोभावाने स्थापना केली. त्यानंतर देवी पंचक्रोशीत श्री रत्नेश्वरी देवीच्या नावाने प्रसिद्धीस आली. कार्ला येथील एकवीरा आईचा प्रती अवतार म्हणूनही रत्नेश्वरी देवी ओळखले जाते.

जेएनपीए बंदर आणि वसाहत अस्तित्वात येण्यापूर्वीच अनेक वर्षांपासून देवीचे मंदिर त्याच जागी होते. त्यानंतर ३५ वर्षांपूर्वी देवी जसखार गावाच्या वेशीवर हलविण्यात आले. तर ९ वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी जुन्या कौलारू मंदिराचे जिर्णोद्धार करून सुमारे चार कोटी रुपये खर्चून भव्य दिव्य मंदिराची उभारणी केली आहे. दरवर्षी या जसखार गावात यात्रा पालखी सोहळा साजरा करण्यात येतो. यावर्षीही सोमवारी २१ ते २३ असा सलग तीन दिवस देवीचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येणाऱ्या यात्रा पालखी सोहळ्यासाठी दरवर्षी पंचक्रोशितील ८४ गावे आणि रायगड, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पनवेल परिसरातुन लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात.

भक्तांच्या हाकेला धावणारी, नवसाला पावणारी आणि भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी देवी म्हणून येथील पंचक्रोशीत ख्याती असलेल्या देवीच्या मंदिरात नवरात्री निमित्तानेही हजारो भाविक आईचा उदो उदो करीत नतमस्तक होतात.

रत्नेश्वरी देवीची यात्रा व पालखी सोहळ्यानिमित्त कै. सौ. आशा पांडुरंग पाटील यांच्या स्मरणार्थ सोमवार (दि २१) व मंगळवार (दि. २२) सकाळी ११.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत सारा प्रोडक्शन वतीने अन्नदान केले जाते. यंदाचे १७ वे वर्ष आहे, असे सारा प्रोडक्शन चे मालक राजेश पांडुरंग पाटील यांनी सांगितले अन्नदानांचे आयोजक समर्थ राजेश पाटील हे आहेत.





# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा; सोन्याचे मंगळसूत्र केले परत



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रिक्षा प्रवासी सेवा देताना स्वतःचा प्रामाणिकपणा दाखवत सांगडा येथे राहणारा रिक्षाचालक नियाज इस्माईल खोत यांनी माणुसकीपेक्षा श्रेष्ठ काही नसत हे आपल्या वागण्यातून सिद्ध केले.

खालापुर तालुक्यातील पाली फाटा ते शीळफाटा येथे प्रवास करणारी ठाणे न्हावे येथील गीता राजू वाघमारे ही आदिवासी महिला यांनी नियाज खोत यांच्या रिक्षामधून प्रवास केला. त्यावेळी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र रिक्षात पडले, त्याच क्षणी वेळ न घालवता नियाज खोत यांनी रिक्षा माघारी फिरवून परत त्या प्रवासी आदिवासी महिलेला देण्यासाठी चालक नियाज खोत यांनी पोलीस स्टेशन गाठले व त्या महिलेला त्यांची गहाळ झालेली सोन्याचे मंगळसुत्र पुन्हा मिळवून दिले.

पोलीस अधिकारी राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली समक्ष गीता वाघमारे यांना सुपूर्द केली. या वेळी नियाज खोत यांच्या प्रामाणिक पणाचे पोलीस प्रशासन व आदिवासी कुटुंबियांकडून विशेष कौतुक करण्यात आले. समाजात रिक्षा चालक व प्रवासी यांच्यातील विश्वास असाच माणुसकी धर्म पाळून रहावा व प्रामाणिकपणाच सदैव कौतुक व्हावे, असे सामाजिक कार्यकर्ते अझीम मांडलेकर यांनी शाबासकीची थाप देत सांगितले.

## संपादकीय

# लाख मोलाचे सोने!

एप्रिलच्या शेवटच्या दिवशी अक्षय्यतृतीया आहे. सोनेखरेदीसाठीच्या शुभ मुहुर्तांपैकी हा एक दिवस. पण सध्या अक्षय्यतृतीया असो वा एप्रिल-मेमधील लग्नसराई, सोने खरेदी करण्याची इच्छा असणाऱ्या सगळ्यांचीच झोप सोन्याच्या सतत वाढणाऱ्या दरांनी उडवली आहे. सोमवारी देशात सोन्याने जीएसटीसह एक लाखाचा टप्पा ओलांडला.

**सोनेखरेदीशी काही देणे-घेणे नसणाऱ्या अगदी सर्वसामान्य ग्राहकांचे लक्षही गेले काही दिवस सोने कधी लाखाचा टप्पा पार करते याकडे लागले होते. तो एक लाखाचा टप्पा ओलांडून सोन्याचे दर सोमवारी भारतात जीएसटीसह सुमारे १,०१,४०० रूपये प्रतितोळ्यावर पोहोचले. गेल्या चार वर्षांत आपल्याकडची सोन्याची किंमत अक्षरश: दुप्पट झाली असून गेल्या आठवड्यात भारतात सोन्याने ९८००० रूपये प्रति दहा ग्रॅम अशी पातळी नोंदवली. आजपर्यंत कधीच सोन्यात इतकी अभूतपूर्व तेजी पाहिली नसल्याने सगळ्यांनाच सोन्याविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेल्या व्यापारयुद्धामुळे सोन्याचे भाव झपाट्याने वाढत असल्याचे सांगितले जाते. ही परिस्थिती सोन्याला नेमकी कुठवर घेऊन जाईल हे सांगणे तज्ज्ञांनाही अवघड झाले आहे. अमेरिका-चीन दरम्यानच्या व्यापारयुद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिरता अनुभवत असून त्याचे परिणाम जगभरात जाणवत आहेत. या घडामोडींतून जागतिक अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची भीतीही आहे. त्यामुळेच गेले काही दिवस गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याकडे वळत आहेत. अधिक परतावा हवा असेल तर सोने खरेदी करा असा सल्ला गुंतवणूक तज्ज्ञांनी यापूर्वीच दिला आहे. त्यामुळे मागणी वाढून सोन्याच्या दरात मोठी उसळी पहायला मिळते आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही मध्यवर्ती बँका आणि आर्थिक संस्थांकडून सोनेखरेदी होत असल्यामुळेही सोन्याचे भाव वेगाने वाढले आहेत असे तज्ज्ञ सांगतात. भारतीय मध्यवर्ती बँक म्हणजेच रिझर्व्ह बँकेने या वर्षात देखील सोनेखरेदी चालू ठेवली आहे. मार्च महिन्यात रिझर्व्ह बँकेने सुमारे ६०० किलो सोनेखरेदी केली. गेल्या वर्षी भारताने ५७.५ टन सोने खरेदी केले होते. त्यामुळे देशाच्या तिजोरीत आता सुमारे ८८० टन सोने आहे. सर्वसामान्य नोकरदार लोकांकरिता मात्र सोनेखरेदी ही आता निव्वळ चर्चा करण्यापुरतीच उरते की काय अशी चिन्हे आहेत. अनेक नोकरदारांकरिता त्यांच्या महिन्याच्या पगारापेक्षाही सोन्याचा प्रतितोळा भाव जास्त झाला आहे. त्याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे सोने खरेदी करू इच्छिणाऱ्या लोकांना आता वाढलेल्या किंमतीनुसार जीएसटी आणि घडणावळ म्हणजेच मेकिंग चार्जेस द्यावे लागतील. अर्थात ते काहीही असले तरी ज्याला लग्नसराईत सोने खरेदी करायचे आहे, त्याला ते या चढ्या दरांनी का होईना खरेदी करावेच लागेल अशी प्रतिक्रिया सामान्य खरेदीदार सोन्याने लाखाचा टप्पा पार केल्यावर व्यक्त करीत होते. जोपर्यंत अमेरिका आणि चीन या जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सुरू असलेल्या व्यापारयुद्धात काही तोडगा निघत नाही तोपर्यंत सोन्याची ही भाववाढ सुरूच राहण्याची शक्यता आहे असे तज्ज्ञ सांगतात. गेल्या चार वर्षांत सोन्याने गुंतवणुकीवरील परताव्याचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. २०२२ आणि २०२३ मधील वार्षिक परतावा सरासरी १५ टक्के आणि २०२४ मध्ये तो २१ टक्के एवढा होता. तर २०२५च्या पहिल्या चार महिन्यांत सुमारे २५ टक्के एवढा परतावा सोन्यात मिळाल्याचे दिसते. आता ग्राहकांकडून सोन्याची मागणी कमी झाली असली तरी उत्सुकता मात्र वधारली आहे.**

# वेव्हज २०२५ : भारतासाठी जागतिक कंटेंट हब बनण्याची सुवर्णसंधी!

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) २०२५' अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपली आहे. १ मे ते ४ मे २०२५दरम्यान मुंबई येथील जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी येथे होणारी ही भव्य समिट, भारताला जागतिक पातळीवर 'कंटेंट सुपरपॉवर' म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. WAVES २०२५ ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

WAVES २०२५: **का आहे ही परिषद खास?**

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media Entertainment - ME) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. जढढ, ॲनिमेशन, गेमिंग, तत्रद्ध, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. FICCIAEY रिपोर्टनुसार २०२४मध्ये भारतीय चए उद्योगाची किंमत २८ अब्जच्या पुढे गेली असून, २०२५पर्यंत तो ३४ अब्ज गाठेल असा अंदाज आहे.

याच पार्श्वभूमीवर WAVES २०२५ ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

**भारत - सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर**

भारतात सध्या दरवर्षी २,०००पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात २०पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. OTT प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने 'कंटेंट एक्स्पोर्ट हब' होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WAVES २०२५ या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची चए क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल.

ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर वेव्हजचेही दरवर्षी आयोजन

वेव्हज् ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दाओस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

**वेव्हज परिषदेस १००पेक्षा जास्त देश होणार सहभागी**

सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मंनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह इँकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस १००पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी २०पेक्षा खूप मोठा असणार आहे.

WAVES समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटक: 'Create in India'वर भर: "Make in India'पाठोपाठ आता "Create in India' ही नवी संकल्पना WAVES समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.

सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ: भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी.

ग्लोबल सहयोग आणि भागीदारी: Netflix, Amazon, Disney+, Sony Pictures यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम: AI, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

धोरणात्मक चर्चासत्रे: धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

क्रिएट इन इंडिया चॅलेंज - जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

वेव्हेक्स २०२५ - हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणारा असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.

मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे - उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.

वेव्हज शिखर परिषद ही सर्जनशील कलाकार, खरेदीदार आणि बाजारपेठांना मोठ्या व्याप्तीच्या सर्जनशील उपाययोजनांसोबत जोडणारा दुवा म्हणून उदयाला येत असल्याचे सांगुन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हेज २०२५ या शिखर परिषदेसाठी १ लाखांपेक्षा जास्त नोंदणी झाली आहे, यातून भारताच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे या परिषद अंतर्गत आघाडीच्या नवोन्मेषकांना सध्याच्या बदलत्या जागतिक माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून पुरस्कारांनी सन्मानित केले जाईल अशी माहिती त्यांनी दिली. आम्ही जगाला आपल्या देशातील सर्जनशील कलाकारांसोबत जोडण्याचे माध्यम शोधत आहोत, असे वैष्णव यांनी सांगितले. वेव्हज शिखर परिषद ही सर्जनशील कलाकार, खरेदीदार आणि बाजारपेठांना मोठ्या व्याप्तीच्या सर्जनशील उपाययोजनांसोबत जोडणारा दुवा म्हणून उदयाला येत असल्याची बाबही अश्विनी वैष्णव यांनी नमूद केली. सर्जनशील कलाकार व्यावसायिक प्रकल्पांसाठी आपल्याकडील आशय सामग्री मांडू शकतील तसेच या क्षेत्रातील कंपन्यासाठी दर्जेदार सर्जनशील कामांचे स्रोत उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारचे खरेदीदार आणि विक्रेत्यांसाठीचे एक अनोखे व्यासपीठ वेव्हज परिषदेच्या माध्यमातून उपलब्ध झाले असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

या क्षेत्रात तंत्रज्ञानाचे आगमन झाल्याने आता जुनी प्रारुपे नवीन प्रारुपांना मार्ग मोकळा करून देत आहेत, ज्यामुळे जशा संधी निर्माण होत आहेत, त्याचप्रमाणे नवी आव्हाने देखील निर्माण होत आहेत असे ते म्हणाले. सद्यस्थितीत माध्यम जगताचे स्वरूप बदलत आहे, अशा वेळी या नव्या प्रारुपाला एक देश म्हणून सामूहिकपणे प्रतिसाद देण्याची गरज आहे ही बाब त्यांनी अधोरेखित केली. या संदर्भात बोलताना त्यांनी कंटेट अर्थात आशय निर्मितीसाठी पूर्वी मोठ्या स्टुडिओंची आवश्यकता होती, मात्र आता ते दिवस भूतकाळात जमा झाले असल्याचे उदाहरण त्यांनी मांडले. आजच्या काळात झारखंड किंवा केरळमधील दुर्गम गावातूनही एखादा सर्जनशील कलाकार दर्जेदार निर्मिती करू शकतो व कलाकृती लाखो लोकांपर्यंत पोहचवू शकतो, असे त्यांनी सांगितले.

या क्षेत्रातील कंपन्यासाठी दर्जेदार सर्जनशील कामांचे स्रोत उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारचे खरेदीदार आणि विक्रेत्यांसाठीचे एक अनोखे व्यासपीठ वेव्हज परिषदेच्या माध्यमातून उपलब्ध झाले असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

**- वर्षा फडके-आंधळे,**
**वरिष्ठ सहायक संचालक (नव माध्यम)**

## बदलते तंत्रज्ञान

# हिरो एक्सट्रीम १२५आर सिंगल सीट व्हेरिएंट लाँच

हिरो मोटोकॉर्पने भारतीय बाजारात एक्सट्रीम १२५आर चा सिंगल-पीस सीट प्रकार लाँच केला आहे. त्याची एक्स-शोरूम किंमत १,००,१०० रुपये ठेवण्यात आली आहे, जी स्प्लिट-सीट एबीएस व्हेरिएंटच्या बरोबरीची आहे.या प्रीमियम कॉम्प्युटर बाईकमध्ये सिंगल चॅनेल एबीएससह डिस्क ब्रेक आहेत.



डिझाइन: सर्व एलईडी लाइटिंग आणि ३ रंग पर्यायआहेत


हायपर-स्टायलिश डिझाइनसह, नवीन हिरो एक्सट्रीम १२५आरला एक तीक्ष्ण, स्पोर्टी आणि आक्रमक लूक देण्यात आला आहे. बाईकला अँगुलर टँक एक्सटेंशन, स्लिम टेल सेक्शन आणि लहान एक्झॉस्ट देण्यात आले आहे, ज्यामुळे तिचा लूक स्पोर्टी बनतो. ही मोटरसायकल ३ रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे हिरो एक्स्ट्रीम १२५आर ही डायमंड प्रकारच्या फ्रेमवर बनवली आहे आणि बॉक्स-सेक्शन स्विंगआर्मसह येते. आरामदायी रायडिंगसाठी, बाईकच्या पुढच्या बाजूला पारंपारिक टेलिस्कोपिक फोर्क्स सस्पेंशन आणि मागील बाजूला ७-स्टेप ॲडजस्टेबल हायड्रॉलिक मोनोशॉक ॲब्सॉर्बर आहे.

ब्रेकिंगसाठी, बेस मॉडेलमध्ये कम्बाइंड ब्रेकिंग सिस्टम सह २४० मिमी फ्रंट डिस्क ब्रेक आहेत, तर स्प्लिट-सीट आणि नवीन सिंगल-पीस सीट -इड आवृत्त्यांमध्ये सिंगल चॅनेल -इड सह २७६ मिमी फ्रंट डिस्क ब्रेक आहेत, तर सर्व प्रकारांमध्ये मागील बाजूस १३० मिमी ड्रम ब्रेक आहेत.

इंजिनला वेट मल्टी-प्लेट क्लचसह ५-स्पीड कॉन्स्टंट मेश गिअरबॉक्सशी ट्यून केले आहे. कंपनीचा दावा आहे की ही बाईक फक्त ५.९ सेकंदात ०-६० किमी प्रतितास वेग गाठू शकते आणि तिचे प्रमाणित मायलेज प्रति लिटर ६६ किमी आहे.

हिरो एक्सट्रीम १२५आर हेडलाइट युनिट आणि पूर्ण एलईडी लाइटिंग सेटअप आहे. बाईकमधील टँक एक्सटेन्शन खूपच तीक्ष्ण आहे. अँगल केलेले साइड पॅनल्स, हाय-सेट टेल सेक्शन आणि टायर हगर यामुळे बाईक स्पोर्टी दिसते.याशिवाय, बाईकमध्ये स्प्लिट पिलियन ग्रॅब रेलची सुविधा आहे. इन्स्ट्रुमेंट कन्सोल ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी आणि टर्न-बाय-टर्न नेव्हिगेशन, कॉल आणि एसएमएस अलर्टसह वेग आणि इंधन पातळीची माहिती देते.

# भाषाशास्त्रज्ञ डॉ. अशोक केळकर



## निमित्त

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे एक भाषातज्ज्ञ म्हणून डॉ. अशोक केळकर यांची ओळख होती. एक उत्तम प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना संदर्भांसह उत्तरे देणारे एक अभ्यासक म्हणून त्यांच्याविषयी त्यांच्या विद्यार्थ्यांना खूप आदर होता. अगदी एखाद्या विद्यार्थ्याने पत्राने आपली शंका त्यांच्यापर्यंत पोहोचविली, तरी त्या प्रश्नाला उत्तर देणाऱ्या पत्रामध्येही डॉ. केळकर संदर्भांची माहिती द्यायला विसरत नसत

डॉ. अशोक केळकर यांचा जन्म पुण्यातील मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. रमणबागेतील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. व्याकरणाची आवड आणि भाषिक प्रश्नांबद्दलच्या कुतूहलामुळे ते भाषाविज्ञानाच्या अभ्यासाकडे वळले. फर्ग्युसन कॉलेजमधून त्यांनी तत्त्वज्ञान आणि इंग्लिश या विषयांची पदवी प्राप्त केली. त्यानंतर अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातून इंग्रजी आणि फ्रेंच या भाषांमधून एम. ए. पूर्ण केले. त्यांनी १९५८ ते ६२ या कालावधीत आग्रा विद्यापीठात भाषाशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. ते १९६२ ते ६७ दरम्यान पुणे विद्यापीठात रीडर होते. डेक्कन महाविद्यालयात १९६७ ते ८९ दरम्यान त्यांनी भाषाशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. एम. फिल आणि पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही ते मार्गदर्शन करत. अमेरिका, नेपाळ, ऑस्ट्रिया, जर्मनी, इंग्लंड, पोर्तुगाल, रशिया, कॅनडा अशा अनेक देशांमध्ये झालेल्या भाषेशी संबंधित चर्चासत्रांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. शिक्षक, मार्गदर्शक आणि संशोधक या भूमिकांमध्ये न अडकता त्यांनी भाषेशी संबंधित विविध क्षेत्रांचा अभ्यास करून, त्यावर लिखाण केले. भाषा आणि सांकेतिक सिद्धान्त, साहित्य आणि कलेतील समस्या, भाषेचा शास्त्रीय अभ्यास, भाषीय समस्या यावर त्यांनी वारंवार प्रकाश टाकला.

महाराष्ट्र साहित्य परिषद, लिंग्विस्टिक सोसायटी ऑफ अमेरिका, नित्यभारती कथक नृत्य अकादमी पुणे, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश अँण्ड फॉरिन लँग्वेजेस, मराठी अभ्यास परिषद, राज्य मराठी विकास संस्था अशा विविध संस्थांच्या माध्यमातून ते कार्यरत होते. भारत, कॅनडा आणि रशियातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि सरकारी संस्थांसाठी त्यांनी सल्लागार म्हणून भूमिका बजावली. सध्या अस्तित्वात असलेली १०+२+३ या शिक्षणपद्धतीची शिफारस त्यांनी शिक्षण समितीकडे केली होती.मराठी अभ्यास परिषदेचे ते सात वर्षे अध्यक्ष होते. 'भाषा आणि जीवन' या मुखपत्राचे प्रमुख संपादक होते.

माणसाला माणसांशी जोडणाऱ्या भाषेचा मूलगामी अभ्यास करणारे ज्येष्ठ भाषाशास्त्रज्ञ, समीक्षक डॉ. अशोक रामचंद्र केळकर (वय ८५) वृद्धापकाळाने २० सप्टेंबर, २०१४ रोजी औरंगाबाद येथे त्यांचे निधन झाले. भाषाशास्त्रातील त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना साहित्य अकादमी, पद्मश्री आदी सन्मानांनी गौरविण्यात आले.

कोणतेही पुरस्कार, मान-सन्मान यापेक्षा 'आपण काय लिहिलेय, मी काय म्हणतोय हे जिज्ञासूंनी वाचावे,' अशी डॉ. केळकरांची इच्छा होती. (साभार इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# घामाची दुर्गंधी दूर करण्याचे बेस्ट उपाय

उन्हाळा सुरू झाला की, घामामुळे लोक हैराण होतात. सोबतच घामाच्या दुर्गंधीमुळे त्यांना आणि इतरांनाही त्रास होते. अशात चार चौघात जाण्यासही भिती वाटते. त्यामुळे घामाच्या दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी आम्ही काही घरगुती उपाय तुम्हाला सांगणार आहोत...

आधी जाणून घेऊया घामाच्या दुर्गंधीची कारणे. फार जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्यानेही शरीराची दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे उन्हाळयात जास्त मसालेदार पदार्थ खाणे टाळावेत. तणाव असल्यावर शरीरातून घाम अधिक निघतो. यादरम्यान शरीरात कॉर्टिसोल हार्मोन अधिक रिलीज होतात.



ज्यामुळे असं होतं. जास्त प्रमाणात निघालेला घाम जेव्हा बॅक्टेरियाच्या संपर्कात येतो तेव्हा दुर्गंधी येऊ लागते. जर तुम्ही फार जास्त औषधे घेत असाल तर याचा प्रभाव तुमच्या शरीरावरही होतो. औषधांमधील रासायनिक तत्व शरीराच्या गंधाला प्रभावित करतात. अशात घाम आणि शरीराचा गंध मिळून दुर्गंधी निर्माण होते.

आंघोळीच्या पाण्यात काही थेंब गुलाबजल टाका. गुलाबजल एक नॅचरल कुलर आहे. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच तुम्ही घामाची दुर्गंधी दूर करण्यासाठी अंडरआर्ममध्ये बटाट्याच्या स्लाइसने रब करा. यानेही दुर्गंधी जाते.

आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी फिरवा किंवा पदीन्याची पाने बारीक करून टाका. यानेही घामाची दुर्गंधी दूर होण्यास मदत मिळते.

बेकिंग सोड्याचा तुम्ही टॅल्कम पावडरच्या रूपात वापर करू शकता. बेकिंग सोडा एक पाण्यात मिक्स करा आणि हे पाणी, काखेत, पायांच्या बोटांच्या मधे लावा. यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे बेकिंग सोडा टाका. कपडे घालण्याआधी हे मिश्रण घाम येणाऱ्या भागांवर लावा.

पाणी उकळुन घ्या आणि त्यात ग्रीन टी ची काही पाने टाका. हे पाणी थंड झालं तर कॉटनच्या मदतीने ते घाम येणाऱ्या भागात लावा. चहा त्वचा शुष्क आणि गंधमुक्त ठेवण्यास मदत करते. याचा वापर तुम्ही आठवड्यातून दोनदा करा.

एज कप ताजा टोमॅटोचा रस घ्या आणि तो एक बकेट पाण्यात टाका. या पाण्याने आंघोळ करा. टोमॅटोमधील अँटीसेप्टीक गुण कोणत्याही प्रकारचा गंध निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाला नष्ट करण्यास मदत करतो.

# ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकाराचा महत्त्वाचा हिस्सा - आमदार प्रवीण दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथे जनकल्याण सहकारी पतसंस्थेच्या वतीने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या पतसंस्थाचा गौरव करण्यात आला होता. या प्रसंगी आमदार प्रवीण दरेकर यांनी सहकाराचे महत्त्व सांगताना महाराष्ट्राच्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत सहकाराचा महत्वाचा हिस्सा प्रतिपादन केले.



रविवार दि २० एप्रिल रोजी जनकल्याण सहकारी पतसंस्थेच्या वतीने महाड येथील विरेश्वर मंदिर सभागृहात आ. प्रविण दरेकर यांच्या हस्ते पतसंस्थेचा सत्कार व व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ अजय जोगळेकर, उपाध्यक्ष दिलीप पार्टे, सहायक निबंधक तुषार लाटणे, बिपीन महामुणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना दरेकर म्हणाले आज सहकार सक्षम करण्याची गरज आहे मात्र कोकणात तसे होताना दिसत नाही. पश्चिम महाराष्ट्रात सहकारातून मोठ मोठे उद्योग उभे राहीले, विकास झाला तोच विकास मला कोकणात आणि महाड मध्ये अपेक्षित आहे. या साठी आपण सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे ते म्हणाले. मुळात आपल्याकडे संस्था कशी स्थापन करायची याचेच ज्ञान नसते, स्थापन केली तर ती चालवायची कशी आणि टिकवायची कशी या बाबत प्रशिक्षण देणार असल्याचे सांगितले. मात्र असे जरी असले तरी कोकणातल्या जिल्हा सहकारी बँका उत्तम आहेत, सहकारी संस्थामध्ये भ्रष्टाचार नाही, मात्र तोच उलटा प्रकार विदर्भात आहे. त्यामुळे सहकारासाठी खर्या अर्थाने कोकणात पुरक वातावरण आहे. कोकणान ठरवल तर सहकाराचा उत्तम कारभार करुन आर्थिक उन्नती करू शकते.

स्वयम पुनर्विकास मुळे मुंबईतला मराठी माणूस मुंबईत राहीला याची दखल घेत क्लस्टर डेव्हलपमेंट साठी मुख्यमंत्री यांनी दरेकर समीती स्थापन केली आहे हा आपल्या महाडकरांचा अभिमानाचा विषय आहे. महिला व तरुणांना माझे आवाहन आहे की त्यांनी सहकारी संस्था स्थापन करून फळप्रक्रिया किंवा इतर उद्योग निर्मिती करावी आपण सहकार्य करु असे आश्वासन दरेकर यांनी या वेळी दिले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ अजय जोगळेकर यांनी अडचणीत आलेली संस्था २००६ मध्ये सभासदांनी पुढाकार घेऊन आम्ही धुरा हाती घेतली आणि आज ही संस्था प्रगती पथावर असल्याचे म्हणाले.

तुषार लाटने यांनी सहकार व त्यातील प्रश्न या विषयी प्रशिक्षण घेण्याचा माणस असल्याचे सांगुन आ.दरेकर साहेबांमुळे आज सहकाराला बळ मिळत असल्याचे म्हणाले.

## माणगावचे विजय मेथा महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्काराने सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे येथील केपीएम मीडिया यांच्यातर्फे माणगाव येथिल राईस मिलचे मालक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रसिद्ध उद्योजक खेमचंद (विजयशेठ) चुनीलाला मेथा यांना रविवार दि. २० एप्रिल रोजी महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५ ने सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्याहस्ते व माजी नगरसेवक बाळाराम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानीत करण्यात आले.



केपीएम मीडिया यांच्यातर्फे उद्योजकांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने उद्योग गौरव पुरस्काराचे प्रथमच आयोजन करण्यात आल होते. उद्योजक विजय मेथा यांनी माणगाव तालुक्यातील तळेगाव येथिल धनंजय राईस मिलच्या माध्यमातू उद्योग क्षेत्रात भरारी घेतली आहे.

विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव या आपल्या सेवाभावी ट्रस्टतर्फे ३ वर्षांपासून ते शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या सहकार्याने प्रत्येक महिन्याला मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन स्वखर्चाने करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांच्याकडे आदराने पहिले जाते.

## भाजप उत्तर महाड अध्यक्षपदी निलेश देवगिरकर आणि दक्षिण अध्यक्षपदी निलेश तळवटकर

**महाड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी महाड तालुक्याचे उत्तर महाड व दक्षिण महाड असे विभाजन करुन, मंडल अध्यक्षपदाच्या झालेल्या निवडणुकीत उत्तर महाड मध्ये निलेश देवगिरकर व दक्षिण महाड मध्ये निलेश तळवटकर यांची निवड झाल्याचे आज निवडणूक अधिकारी निलेश थोरे यांनी आज महाड येथे जाहीर केले.



महाड तालुका भारतीय जनता पार्टी मंडळ अध्यक्ष निवड प्रक्रिया २०२४/२५ अंतर्गत झालेल्या निवडणुकीत उत्तर महाड मंडल व दक्षिण महाड मंडळ असे दोन भागांच्या वेगवेगळ्या निवडणुका घेऊन यामध्ये महाड निवडणूक अधिकारी निलेश थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या होत्या .भारतीय जनता पार्टीच्या महाड कार्यालयात उत्तर महाड व दक्षिण महाड मंडळ अध्यक्षाची नियुक्ती जाहीर करण्यात आली. लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया खऱ्या अर्थाने राबविणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या महाड मंडल अध्यक्षाच्या निवडणुकीत संपूर्णपणे पारदर्शकता बाळगून पार पडली. या निवडणुकीत उत्तर महाड मधून आठ उमेदवारांनी तर दक्षिण महाड मधून सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दरम्यान उत्तर महाड मधून निलेश देवगिरकर तर दक्षिण महाड मधून निलेश तळवटकर यांची निवड निलेश थोरे यांनी आज जाहीर केली.

## श्रीवर्धनमध्ये काजू पीक लागवडीकडे बागायतदारांचा वाढता कल

### नवीन कृषिसंपन्न स्थिर उत्पन्नाचा स्त्रोत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुका, कोकण किनारपट्टीवर वसलेला एक समृद्ध कृषिप्रधान भाग, आज केवळ आंब्यापुरता सीमित राहिलेला नाही. अलीकडच्या वर्षांत इथल्या बागायतदारांनी काजू लागवडीकडे मोठ्या प्रमाणावर लक्ष दिले असून, काजू उत्पादनात श्रीवर्धन एक नवा आदर्श ठरू लागला आहे.



तालुक्यातील उत्तम निचऱ्याची जमीन, थोड्याफार प्रमाणात आम्लयुक्त तसेच डोंगर उतारावरील तांबडी माती ही काजूच्या झाडासाठी अनुकूल ठरत असून, वरकस जमिनीत ही झाडे विशेष जोमाने वाढतात. समुद्रसपाटीपासून ७०० मीटर उंचीपर्यंतच्या भागात काजूचे पीक भरघोस येते. तालुक्याचे उष्ण व दमट हवामान काजू उत्पादनासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे.

सध्या श्रीवर्धनमध्ये ११६५ हेक्टर क्षेत्रात काजू लागवड करण्यात आली असून, त्यापैकी ६७० हेक्टर क्षेत्रात सक्रिय उत्पादन घेतले जात आहे. प्रारंभी केवळ हौसेने लागवड केली जात असताना, आता ही लागवड बागायतदारांसाठी स्थिर उत्पन्नाचा स्त्रोत बनली आहे. विशेषतः हापूस आंबा हे एक वर्षाआड येणारे पीक असल्यामुळे बागायतदारांनी पर्यायी उत्पन्नासाठी काजूकडे वळण्यास सुरुवात केली आहे.

तालुक्यात मुख्यत्वे वेंगुर्ला-४ आणि वेंगुर्ला-७ या सुधारित जातींची लागवड करण्यात येत आहे. वेंगुर्ला-४ जातीत एका किलोत सुमारे १४० बिया असून गराचे प्रमाण ३०% असते. तर वेंगुर्ला-७ जातीमध्ये एका किलोत सुमारे १०० बिया असून गराचे प्रमाण ३१%पर्यंत पोहचते.

काजू झाडांची सुरुवातीपासून योग्य निगा घेतल्यास, लागवडीनंतर केवळ तीन ते चार वर्षात झाडांपासून उत्पादन सुरू होते आणि पुढे ४०-५० वर्षांपर्यंत सतत उत्पन्न मिळते. नोव्हेंबरमध्ये झाडांना मोहोर येतो, आणि साधारणतः डिसेंबर-जाने वारीत त्यावरून अधिकाधिक फळधारणा होते. मोहोरानंतर ६५-७० दिवसांत काजू फळे काढणीसाठी तयार होतात. लवकर मोहोर आलेल्या झाडांवरील फळे ६० दिवसांत तयार होतात, तर उशिरा आलेल्या मोहोराची फळे ४५ दिवसांत काढणीसाठी योग्य होतात.या सगळ्या प्रक्रियेमध्ये मोहोरांची विशेष निगा राखणे हेच उत्पादन वाढवण्याचे गुपित आहे.

श्रीवर्धनमधील बदलती कृषीचित्रे आता केवळ आंब्यावर केंद्रित न राहता, काजूसारख्या उत्पन्नक्षम पिकांकडे वळली आहेत. या नव्या कृषिकथेमुळे श्रीवर्धनचे नाव केवळ हापूस आंब्यापुरते मर्यादित न राहता, देशाच्या काजू नकाशावर ठळकपणे उमटत आहे.

**काजू पिकाच्या लागवडीसाठी फळबाग लागवड योजनेअंतर्गत अनुदान आहे तसेच काजू फळ प्रक्रियेसाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेअंतर्गत अनुदान आहे. श्रीवर्धन तालुक्यातील काजू बागायतदारांनी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा.**

**-श्रध्दा डुंबरे,**
कृषी अधिकारी, श्रीवर्धन

## वेदिका पाटीलचे सुयश

**रेवदंडा :** नागाव ग्रामपंचायत हद्दीतील खारगल्ली मराठी शाळेतील विदयार्थीनी वेदिका प्रविण पाटील हिने प्रज्ञा शोध परिक्षेत सुयश मिळविले. वेदिका हिने संपुर्ण रायगड जिल्हामध्ये पाचवा क्रमांक व अलिबाग तालुक्यात तृतीय क्रमांकाने सुयश मिळविले. तिच्या यशाबद्दल शाळेत तिच्या सन्मान कार्यक्रम घेण्यात

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवासी इंग्रजी शाळेत शिकण्याची संधी

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदिवासी (अनुसूचित जमाती) समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवते. आदिवासी मुलांना शहरातील नामांकित निवासी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना अशा शाळांमध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश दिला जाणार आहे.

इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये प्रवेश घ्यायचा असेल तर इच्छुकांनी परिपूर्ण अर्ज १५ मे २०२५ पूर्वी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण रॉयल ग्रॅन्डीअर बिल्डींग, पहिला मजला, रामवाडी, पेण येथे सादर करावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी आत्माराम धावे यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा, पालकाने विद्यार्थ्यांच्या नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी, यासाठी मुलाच्या पालकाच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा १ लाख रूपये ठेवण्यात आली आहे. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय ३१ डिसेंबर २०२५ रोजी ६ वर्षे पूर्ण असावे, त्याचा जन्म १ जुलै २०१८ ते ३१ डिसेंबर २०१९ दरम्यान झालेला असावा, अर्जासोबत दोन पासपोर्ट फोटो आणि जन्मतारखेचा पुरावा म्हणून ग्रामसेवकाचा जन्माचा दाखला तसेच, अर्जासोबत विद्यार्थ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडण्यात यावे, आधारकार्डची झेरॉक्स जोडण्यात यावी, विद्यार्थ्याचे पालक शासकीय, निमशासकीय नोकरदार नसावेत, खोटी माहिती सादर केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

निवड केलेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्चिती झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पालकांच्या किंवा पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही. अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्र. ०२१४३-२५२५१९ कार्यालयीन वेळेस संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

**मौजे मोहो तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड,**

| भुमापन नं. / हि नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १११/४/ब | ०-१६-०० | ३.३८ | वैभव नारायण चोरघे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी. दान, भक्ता वहिवाट ताबा, देखभाल, गहाण, कुल अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती. तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २१/०४/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे दुंदरे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३२/३ | ०-०३-००<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-०३-५० | ०.०६ | संतोष कान्हा सिनारे<br>दिलीप कान्हा सिनारे<br>हनुमान कान्हा सिनारे<br>गुरुनाथ कान्हा सिनारे<br>प्रभाकर कान्हा सिनारे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २१/०४/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

---

### कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग,

महाड, जिल्हा रायगड ४०२३०१

**ई निविदा शुध्दिपत्रक क्र. १ सन २०२५-२६**

**संदर्भ - या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ०३ सन २०२५-२६ जा.क्र./मवि/निविदा/१३९३ दिनांक ०७.०४.२०२५.**

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | सुतारवाडी येथे ४ स्वतंत्र हॅलिपॅड तयार करणे ता रोहा, जि रायगड | १३९००११५/- |

वरील निविदा सुचना दिनांक ०८.०४.२०२५ पासुन प्रसिध्द करणेत झाली होती. परंतु सदर कामाकरीता आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींची पुर्तता विहित कालावधीत न झाल्यामुळे विषयांकीत कामाची ई निविदा रद्द करणेत येत आहे.

दिनांक : १७/०४/२०२५
जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१५२८

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
महाड (सा. बां.) विभाग, महाड

---

### रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग,

प्लॉट नं. ४१, सेक्टर - ११, कामोठे

**पाहिजेत- बिल्डींग सुपरवायझर**

रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे येथे हंगामी स्वरुपात (B.E. Civil Engineering / M.E. Civil Engineering) शैक्षणिक पात्रता असलेले **एक** बिल्डींग सुपरवायझर पद भरावयाचे आहे. किमान ५ वर्षाचे बांधकाम क्षेत्रातील अनुभव असणे आवश्यक आहे.पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती (Walk - in Interview) दि. २४/०४/२०२५ दुपारी ३.०० वा. आयोजित केल्या आहेत. उमेदवारांनी आपले अर्ज, अनुभव प्रमाणपत्र व शैक्षणिक पात्रतेचे सर्टिफिकेट घेऊन उपस्थित राहावे.

**विभागीय अधिकारी,**
रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे

---

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

---

### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

पिनकोड - ४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२ - २७४५२७७८ फॅक्स०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ०३ (ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२- ७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई- निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

**टिप :-** या निविदेमध्ये एकूण ७ कामे समाविष्ठ असुन ऑफलाईन निविदा विक्री व बीडप्रिपरेशन दिनांक २२.०४.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक २९.०४.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

ई-निविदा जा. क्र./सा.बां./पनवेल/--
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :- २१/४/२०२५
क्र.: आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी३००

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
सा. बां. विभाग, पनवेल

---

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र. ८६/२०२४-२०२५ (मुंबई) करीता

दिनांक २८/०३/२०२५ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... आंबेपूर टँक परिसरात कोसळलेल्या कंपाऊंड भिंतीची पुनर्बांधणी करणे. | ₹ ३६,१६,२१४.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०२/०५/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# सूर्य कोपला! अंगाचा दाह, उष्माघाताचा धोका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कडाक्याच्या उन्हामुळे पनवेलकरांना उन्हाचे दाह जाणवू लागला आहे. अचानक उन्हाचा तडाखा वाढल्याने परिसरात अंगाची लाही लाही करणारे ऊन आणि प्रचंड उकाडा निर्माण झाला आहे. निरभ्र आकाश आणि देशाच्या वायव्येकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे ऊन चांगलेच तळपू लागले आहे. चटके देणारे ऊन आणि घामाच्या धारा अन दिवसभर उकाडा, असा अनुभव सध्या पनवेलकर घेताना दिसून येत आहेत.

उष्माघात म्हणजे नेमके काय याबाबत नागरिकांना चांगलेच कळून चुकले आहे. या अनुषंगाने उष्माघातापासून बचाव करण्यासाठी डॉक्टरांकडून विविध उपाय सांगितले जात आहेत. उष्माघातापासून नागरीकांचा बचाव करण्यासाठी काय करावे व काय करू नये याबाबतची माहिती प्रशासनाकडून



देण्यात आली आहे.

उष्माघातामुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी विविध उपाययोजना डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहेत. तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र, सुती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चप्पलांचा वापर करण्यात यावा. प्रवासात पाण्याची बॉटल सोबत ठेवावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करण्यात यावा. लिंबू पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करण्यात यावा. अशाप्रकारच्या विविध सूचना डॉक्टर, हवामानतज्ज्ञ तसेच जाणकारांकडून देण्यात येत आहेत.

नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

### थंडपेयांना मागणी

ऐन उन्हाळ्यात शरीराला गारवा मिळावा म्हणून आता थंड पेयांना मागणी वाढली आहे. आरोग्यपूरक फळांनाही आता चांगला भाव आलेला आहे. ठिकठिकाणी गल्लोगल्लीत बर्फाचे गोळे विक्रेते फिरताना दिसत आहेत. बाजारात लिंबांनाही चांगला भाव आलेला आहे. याशिवाय थंडगार सब्जाही विकला जात आहे. बाजारात द्राक्षे, कलिंगडांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. रसवंतीगृहातही गर्दी होत आहे.

## रसायनी पोलीस ठाण्याला आयएसओ ए++ नामांकन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकरणाने व्यापलेला परिसर आहे. परिसरात विविध राज्यांतील कामगारवर्ग येथे वास्तव्यास आहे. परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढतच असल्याने रसायनी पोलीस ठाण्यातील पोलिस यंत्रणेवर ही अधिक ताण येत आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर चोख आणि वाखाणण्याजोगी पोलिसी सेवा बजावत असल्याचे पहावयास मिळत आहे. परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी परिसरातील नागरिकांना सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, पोलीस उपनिरीक्षक श्री माळी, पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे आणि रसायनी पोलिस ठाण्यातील पोली कर्मचारी महत्वाची कामगिरी



निभावत आहेत.

दरम्यान, रसायनी पोलीस ठाण्याला आकर्षक केल्याने रसायनी पोलीस ठाण्याला स्मार्ट पोलिस ठाणे म्हणून ओळखले जाते.नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा प्रदान करण्याचे काम रसायनी पोलिस ठाणे करत आहे.

म्हणून रसायनी पोलीस ठाण्याला गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीत योग्य कामकाजाबाबत ए++ ग्रेटने आयएस ओ नामांकन प्राप्त झाले आहे. यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांचे अधिक श्रेय असल्याचे दिसून येते.

## मोहोपाड्यात मागासवर्गीय महिलांच्या बचत गटांना रसवंती मशीनचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांच्या वतीने सोमवारी (दि.२२) वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या सभागृहात जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीय बचत गट वासांबे देवी स्वयं सहाय्यता बचत समूह गट मोहोपाडावाडी व प्रगती स्वयं सहाय्यता बचत समूह गट मोहोपाडावाडी यांना सरपंच उमा संदीप मुंढे, उपसरपंच भूषण लक्ष्मण पारंगे, ग्राम पंचायत अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील व सर्व सदस्यांच्या उपस्थितीत उसाच्या रसाचे मशीन वाटप करण्यात आले.

आदीवासी महिला बचत गटांना उसाचे मशिन मिळाल्याने त्यांना रोजगार उपलब्ध होणार आहे. मशीन मिळालेल्या आदिवासी महिला बचत गटांनी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा संदीप मुंढे, उपसरपंच भूषण पारंगे, ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील व सदस्यांचे आभार मानले.

## बाजारात फळांची आवक वाढली

**नवी मुंबई :** उन्हाळ्यात जागोजागी फळांचे रस, फळांचे सॅलड यांच्या गाड्या लागलेल्या दिसतात. घरी खाण्यासाठीही लोक फळांची खरेदी आवर्जून करतात. त्यामुळे सध्या बाजारात फळांना मागणी वाढली आहे. मात्र, तरीही फळांच्या किमती स्थिर आहेत. बाजारात फळांना चांगला दर मिळत नसल्याचे व्यापारी सांगत आहेत.

फळे नाशिवंत असल्याने उन्हाळ्यात ती लवकर खराब होतात. त्यामुळे ती जास्त वेळ साठवून फळे ठेवता येत नाहीत. परिणामी मिळेल त्या किमतीत ती विकावी लागत असल्याने, फळांच्या किमती कमीच आहेत, अशी माहिती व्यापारी शिवजीराव चव्हाण यांनी दिली आहे.

## उन्हाळ्यात मिनरल वॉटरची मागणी वाढली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रणरणत्या उन्हामध्ये अंगाची लाही होत असताना नागरिक स्वत:च्या आरोग्याची खबरदारी घेताना दिसू लागले आहेत. यामुळे मिनरल वॉटर घेण्याकडे अनेकांचा कल निर्माण होत आहे.

याअगोदर प्रत्येक ठिकाणी वाटसरुची तहान भागविण्यासाठी पाणपोई उपलब्ध असायची, मात्र आता आरोग्याचा विचार करुन प्रत्येक जण बिसलरी पाण्याचा वापर करीत असल्यांचे दृश्य अनेक ठीकाणी पहावयास मिळत आहे. पानटपरी, हॉटेल, किराणा दुकान, लहान व्यावसायीकांकडे मिनरल वॉटर सहजपणे उपलब्ध होत.

मे महिन्यात उन्हाची दाहकता जाणवू लागली असून शरीराची लाही–लाही होऊ लागली आहे. त्यातच लग्नसराई असल्याने बाहेरगावाहून येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. भर उन्हात तहान भागविण्यासाठी पाणपोई उपलब्ध राहिलच अशी स्थिती सध्या दिसत नसल्याने पाणी पाऊच, मिनरल वॉटरच्या बॉटलची खरेदी करण्याकडे कल वाढला आहे. यामुळे पिण्याच्या पाण्याच्या व्यवसायात तेजी आली आहे.

शहरात पूर्वी एस.टी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन सामान्य रूग्णालय परिसरात, उन्हाळ्याच्या दिवसात पाणपोई लावून समाजसेवा



मोठ्या प्रमाणात केली जात असल्याचा इतिहास आहे. ही परंपरा आजही तुरळक ठिकाणी निभावली जात आहे. तहानलेल्या थकलेल्या माणसाला पाण्याचा ग्लास भरून दिला तर त्याचे मन तृप्त केले तर पदरी पुण्य प्राप्त होते. या भावनेतून अनेकांनी या सेवेला जीवनात जोपासले आहे.

पाणपोई या स्थळाला जात, धर्म, पंथ असा भेदभाव नसते. तेथे फक्त मानवता हाच धर्म अनुभवयास मिळतो. म्हणून पाणपोई हे पवित्र स्थळ असून ते माणसा–माणसांना जोडणारे केंद्र म्हटले तर आतिशयोक्ती होणार नाही. आज मिनरल वॉटर, पाणी पाऊच सहज मिळत असल्याने पाणपोईची गरज काय? असाही प्रश्न कोणी उपस्थित करतील. तथापि, ज्यांची पाऊच घेण्याचीही ऐपत नाही ज्यांच्या अंगावर धड कपडेही नाही अश्या लोकांची पाण्याची तहान भागणार कशी? हाही प्रश्न आहे. म्हणून या अर्थाने पाणपोईला अनन्य महत्व असून उन्हाळ्याच्या चार महिन्यात तिचे अनमोल स्थान कुणालाही नाकारता येणार नाही.



























पनवेल : भाजपचे संघटन पर्व सध्या सुरू आहे. त्याला अनुसरून तालुक्यातील नेरे मंडळ अध्यक्षपदी भूपेंद्र पाटील, तळोजा मंडळ अध्यक्षपदी दिनेश खानावकर, नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे, खारघर मंडळ अध्यक्षपदी प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्षपदी सुमित झुंझारराव, कळंबोली मंडळ अध्यक्षपदी अमर पाटील, कामोठे मंडळ अध्यक्षपदी विकास घरत तसेच उरण विधानसभा मतदारसंघातील उलवे मंडळ अध्यक्षपदी रुपेश धुमाळ, कर्नाळा मंडळ अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देत पक्ष संघटनेने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडा, असे आवाहन केले.







# मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर नाव द्या; भाजपची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील नव्याने होत असलेल्या मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर नाव द्या अशी मागणी भारतीय जनता पक्ष खोपोलीने केली आहे,



वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांच्या हुतात्म्याला दिडशे वर्षे पुर्ण झाली असून खंडाळा घाटाचा अवघड रस्ता त्यांनी इंग्रज आधिकाऱ्यांना दाखवला आहे त्यांच्या या योगदानातून मुंबई-पुणे ही दोन विकसित शहरे जोडली गेली त्यांचे स्मारक रुपात खंडाळा घाटात अवघड वळणावर शिंग्रोबा मंदिर आहे. हे धनगर बांधवासह महाराष्ट्रातील असंख्य लोकांचे श्रद्धास्थान असल्याने खंडाळा घाटतील मुंबई-पुणे शहराला जोडणारे नवीन मार्गिकेला हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची खोपोली भाजपने मागणी केली आहे.

सन १८५३ साली भारतात इंग्रजाची सत्ता होती. त्यावेळी इंग्रज अधिकारी व इंजिनिअर यांना अवघड खंडाळा घाटातील रस्ता काढणे जमत नव्हते ह्या रस्त्याचा मार्ग शिंग्रोबा धनगराने दाखवला तेव्हा अधिकाऱ्यांनी खुश होत बक्षीस म्हणून काय पाहिजे ते माग असे सांगितले, परंतु शिंग्रोबा धनगरा स्वाभिमानी होता. मला काही द्यायचे असेल तर आमच्या भारत देशाला स्वातंत्र्य द्या, अशी मागणी त्या इंग्रजांकडे केली. स्वातंत्र द्या हे शब्द इंग्रज गोऱ्या अधिकाऱ्यांचे कानावर पडताच त्यांना भयानक राग आला आणि त्यांनी तत्काळ त्याला गोळ्या घालून ठार केले.

या घटनेला दिडशे वर्ष होऊन गेली असून त्यांचे स्मरण आणि आठवण राहावी यासाठी मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील नवीन तयार करण्यात आलेले मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी माजी नगरसेवक सुर्यकांत देशमुख यांनी रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्याच्या प्रति राज्याचे माजी बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण आणि भाजप नेते आमदार प्रशांत ठाकूर यांना दिल्या असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी या मागणीबाबत सकारात्मक चर्चा करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व ना. रवींद्र चव्हाण यांच्याकडून मार्ग काढू, असे आश्वासन दिले असल्याचे देशमुख यांनी माहिती दिली.

> **मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर बोरघाटात नव्याने तयार करण्यात आलेल्या मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी रायगड जिल्ह्यातील धनगर समाजाची आग्रही असून सरकारने या मागणी कडे तत्काळ लक्ष देऊन या मिसिंग लिंकला वीर हुतात्मा शिंग्रोबा धनगर हे नाव द्यावे**
>
> **-दत्तात्रय शेडगे, युवा नेते, रायगड**

# प्रसूतीदरम्यान नवजात बालकासह आईचा मृत्यू

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

नैसर्गिक प्रसूतीदरम्यान नवजात बालकासह आईचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना कर्जत तालुक्यात घडली आहे. माधुरी रोहन मुकणे असे मृत महिलेचे नाव समोर आले असून ती भालीवडी येथील राहणारी आहे. माधुरी हिला दिवस गेले होते रविवारी सकाळी तिला पोटात कळा आल्याने प्रसूती घरातच करण्यात येत होती, या दरम्यान तिची प्रकृती चिंताजनक झाल्याने घरातील कुटुंबाने तिला कशेळे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, परंतु उपस्थित डॉक्टरांनी बाळाला आणि मातेला मृत घोषित केले.



कर्जत तालुक्यातील भालिवडी येथील लाखाचीवाडी या आदिवासी वाडीत राहणारी २० वर्षीय माधुरी रोहन मुकणे या गरोदर महिलेची प्रसूती राहत्या घरीच करण्यात येत होती. प्रसूतीदरम्यान गरोदर महिलेची गंभीर स्थिती निर्माण झाली होती. सुरुवातीला महिलेच्या वेदना वाढल्या, तब्येत खालावली असल्याने प्रसूती सुरू असतानाच माधुरी बेशुद्ध झाली.

घरच्यांनी तत्काळ कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात गाठले, उपचाराअभावी मात्र डॉक्टरांनी तिला व तिच्या बाळाला मृत घोषित केले. माधुरीची नियमित तपासणी कडाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुरू होती, मात्र वेळेत वैद्यकीय मदत न मिळाल्याने माधुरीचा मृत्यू झाल्याचे आरोप तिच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. तर हे प्रकरण कर्जत पोलीस ठाण्यात जावून पोहचल्याने कर्जत पोलीस ठण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार लालासाहेब तोरवे हे अधिक तपास करीत आहेत.

गेल्या वर्षभरापूर्वी माधुरीचे भालीवडी येथील रोहन मुकणे या तरुणासोबत लग्न झाले होते. माधुरीचे माहेर खालापूर तालुक्यातील कलोते या आदिवासी वाडीतील आहे. दरम्यान, उपचाराअभावी नवजात बालकासह मातेचे झालेल्या दुर्दैवी मृत्यूने परिसरात शोककळा पसरली असून तालुक्यातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# चौल येथे मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथे महाराष्ट्र शासन व कृषक कल्याणकारी संस्था चौल यांचे संयुक्त विदयमाने मधुमक्षिका पालन प्रशिक्षण नुकतेच झाले.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रमुख मार्गदर्शक डॉ. तुकाराम निकम यांनी भुषविले तसेच अलिबाग तालुका कृषी अधिकारी भगत, मंडळ अधिकारी सुर्यवंशी, खादीग्रामोदयोग कवडे, तसेच कृषक कल्याणकारी संस्थेचे संस्थापक रवींद्र पाटील, विद्यमान अध्यक्ष प्रमोद दत्तु पाटील प्रकाश पाटील, प्रवीण नाईक, दिलीप पाटील तसेच कृषक कल्याणकारी संस्था चौलचे पदाधिकारी व सदस्य, शेतकरी व बागायतदार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुरूवात मान्यवराचे हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून, कृषक कल्याणकारी संस्था, चौल अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविकेत संस्थेच्या कार्याची माहिती दिली. कृषक कल्याणकारी संस्था, चौलचे संस्थापक रवींद्र पाटील यांनी प्रशिक्षितांना मधमाश्याच्या जाती, मधमाश्याची वसाहत, त्याचेतील घटक, घटकांची कार्ये, मधमाश्याचा जीवनक्रम, मधमाश्याची वसाहत या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. अलिबाग तालुका कृषी अधिकारी भगत व मंडळ अधिकारी सुर्यवंशी यांनी शासनाच्या मधुमाक्षिका पालन विषयी असलेल्या विविध योजनाची माहिती प्रशिक्षीतांना दिली. तसेच खादीग्रामोदयोग कवडे यांनी खादी ग्रामोदयोग विभागाच्या विविध योजनाची माहिती सांगितला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. तुकाराम निकम यांनी प्रशिक्षीतांना मार्गदर्शन करताना दुसरा हरितक्रांती सोबत, मधूक्रांती यशस्वी होण्यासाठी परगीभवनाची नित्यांत आवश्यकता असल्याचे सांगून फळपिकामध्ये शास्त्रीय मधमाध्यापालन प्रशिक्षण घेऊन शेतीला पुरक सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले. कृषीमालच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी व देशाला अन्न व पोषण मुल्यांच्या सुरक्षीततेसाठी परागी भवनासाठी मधमाश्यापालन हा ऐकमेव पर्याय संजिवनी ठरणार आहे. परिसरात परागकण व मकरंद मोठया प्रमाणात उपलब्ध असल्याने विभागात मधुमाशिका पालन यशस्वी होवू शकतो, परिसरात कृषी साक्षरतेची नित्यांत गरज आहे, असे ते पुढे म्हणाले.

सुत्रसंचलन कृषक कल्याणकारी संस्था, चौलचे सचिव प्रकाश पाटील यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रविण नाईक व्यक्त केले. तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे दिलीप पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भाजप रोहा तालुका अध्यक्षपदी महेश ठाकूर यांची नियुक्ती

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पालेखुर्द गावातील गेली १८ वर्षे सक्रिय समाजकारण, राजकारण राहून गोरगरीब जनतेची सेवा करणारे महेश ठाकूर यांची भारतीय जनता पक्षाच्या रोहा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



रोहा तालुका अध्यक्ष (नागोठणे मंडळ पेण विधानसभा) पदावर निवड झाली. पक्षाने एका कुणबी समाजातील सर्व सामान्य कार्यकर्त्याला रोहा तालुका अध्यक्ष (नागोठणे मंडळ पेण विधानसभा) पदी संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष, खासदार धैर्यशील पाटील, लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप, आमदार रविशेठ पाटील रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ शेठ पाटील यांचे मनःपूर्वक आभार ठाकूर यांनी मानले.

महेश ठाकूर हे रोहा तालुक्यातील नागोठणे व आंबेवाडी जिल्हा परिषद मतदार संघातील सगळ्या बुथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख, पक्षाचे विविध सेल चे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन प्रत्येक गावागावात, वाडी वस्त्यांवर भाजप वाढीसाठी तसेच पक्षाची ध्येयधोरणे, केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना गोरगरीब गरजू लोकांपर्यंत पोहचण्यासाठी काम करीत आहेत रोहा तालुक्यातील भाजप पक्षाच्या माध्यमातून युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष पद गेली ३ वर्ष सांभाळून रोहा तालुका गावोगावी, वाडी वस्त्यावर भाजपचे संघटना बांधणीचे काम केले, पक्षाचे विविध उपक्रम, कार्यक्रम राबविले, विविध आंदोलन सक्रिय सहभाग घेतला.

जनसंपर्कातून युवकांची रोहा तालुक्यात संघटना उभी केली. य नेतृत्वाची दखल पक्ष नेतृत्वाने घेतली आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार यांचे आंबेवाडी जिल्हा परिषद मध्ये गावोगावी प्रचार यंत्रणा राबवून यशस्वी नियोजन केले. विधानसभा निवडणुकीत भाजपचे आमदार रविशेठ पाटील यांना आंबेवाडी मतदार संघात जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सोबत घेऊन आंबेवाडी जिल्हा परिषद मतदार संघात प्रचार यंत्रणा राबविली आहे. पक्ष नेतृत्वाचा आदेश मानून यशस्वी काम आंबेवाडी जिल्हा परिषद मतदार संघात केले या कामाची दखल पक्ष नेतृत्वा घेतली.

भाजप संघटन पर्व निमित्ताने भाजप जिल्हा उपाध्यक्ष व रोहा मंडळ निवडणूक अधिकारी वैकुंठ शेठ पाटील यांच्या उपस्थिती मध्ये महेश ठाकुर यांची रोहा तालुका अध्यक्ष (नागोठणे मंडळ पेण विधानसभा) निवड जाहीर केली महेश ठाकुर यांच्या तालुका अध्यक्ष निवडी नंतर पालेखुर्द गावसह कोलाड, सुतारवाडी, खांब, नागोठणे विभागातील कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

# माणगाव पोलीस ठाण्याला आयएसओ ए++ स्मार्ट पोलीस मानांकन प्राप्त

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील माणगांव पोलीस ठाण्याला नामांकित आयएसओ स्मार्ट ए++ पोलीस ठाणे मानांकन प्रमाणपत्र, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या हस्ते १९ एप्रिल २०२५ रोजी प्रदान करण्यात आले आहे. माणगांव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी हे प्रमाणपत्र अलिबाग येथे जाऊन स्वीकारले आहे.



माणगाव तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी माणगांव पोलीस नेहमी सज्ज असतात. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस सेवा बजावीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलिसांचा जनसंपर्क वाढला असून जनते सोबत सलोख्याचे संबंध निर्माण झाले आहेत. स्मार्ट पोलिसिंग, संवेदनशील, आधुनिक, सतर्क, जबाबदार, विश्वसनीय, सशक्त पोलीस फौज, कर्तव्यदक्ष, कार्यक्षम इ. मुद्द्यांवरती हा पुरस्कार माणगांव पोलीस ठाण्याला प्राप्त झाला आहे.

पोलीस ठाण्यात येणाऱ्या तक्रारदारांना बसण्यासाठी आसन, सुसज्ज इमारत, पाणपोई सध्या अनेक सुख सुविधा माणगांव पोलीस ठाणे येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

माणगाव तालुक्यात सर्व जाती धर्माचे लोक राहतात. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी माणगांव पोलीस अहोरात्र झटत असतात. हा पुरस्कार मिळाल्याने पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व सर्व माणगांव पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'देशसेवेसारखे महान व्रत नाही'

**धाटाव : प्रतिनिधी**

देश सेवेसारखे महान व्रत नाही. सैनिकांप्रती पराकोटीचा आदर बाळगा असे मौलिक विचारधन प्रख्यात कीर्तनकार, ज्ञानेश्वरी कंठभूषण हभप केशव महाराज मुळीक यांनी व्यक्त केले.

संत परंपरा, संस्कार त्याहून जगण्यासाठीचा आनंद, व्यवहारिक मंत्र यावर हभप मुळीक महाराज यांनी संतश्रेष्ठ निळोबाराय यांच्या अभंगावर घर, मंदिर कसे असावे? यावर दृष्टांत निरूपण केले. ते समस्त कोकण श्री विठ्ठल परिवार आयोजित एक दिवसीय कीर्तन महोत्सव गजर कीर्तनाचा, सोहळा आनंदाचा सोहळ्यातील कीर्तनात बोलत होते. प्रवचन हभप बाळाराम शेळके महाराज यांचे झाले. या वेळी विभाग तालुक्यातून हजारो वारकरी उपस्थित होते.

श्री क्षेत्र महादेव मंदिर महादेववाडी येथे शनिवारी रात्रौ कीर्तन महोत्सवात हभप केशव महाराज मुळीक यांची कीर्तन सेवा पार पडली. एकदिवसीय कीर्तन सोहळ्यात पहाटे काकड आरती, अभिषेक, पूजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा, भजन, सायंकाळी प्रवचन व त्यानंतर हभप मुळीक महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. कीर्तन महोत्सवात सामाजिक भान जपण्यात आले. श्री विठ्ठल परिवार यांच्या वतीने शेती, समाजसेवा, देशसेवा करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांचा सत्कार करण्यात आला.

कीर्तन महोत्सवाला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन कीर्तनाचा आनंद घेतला. विभागातील वारकरी संप्रदायातील शेकडो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खोपोलीतील प्राणीरक्षक बनताहेत प्रत्येक जीवासाठी एक आशेचा किरण

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खोपोली या छोट्याशा शहरात एक स्थानिक प्राणी रक्षक शेकडो भटक्या आणि जखमी प्राण्यांसाठी जीवनदाता ठरले आहेत. खोपोली ॲनिमल रेस्क्यूअर या नावाने ओळखले जाणारे हे ग्रुप गेल्या एक वर्षापासून निःस्वार्थपणे प्राणी वाचवण्याचे कार्य करत आहे. शेकरू प्राण्यांचे जीव वाचवण्यात यशस्वी झाल्याच सांगण्यात येत आहे.



हे रक्षक प्रामुख्याने समाजाच्या मदतीने आणि स्वतःच्या कष्टाने हे कार्य करतात. रस्त्यावर अपघात झालेल्या, आजारी किंवा सोडून दिलेल्या प्राण्यांना मदत करण्यासाठी ते वेळप्रसंगी धाव घेतात. किरकोळ जखमा उपचारांपासून मोठ्या शस्त्रक्रियांच्या व्यवस्थापनापर्यंत आणि काही प्राण्यांना काळजीपूर्वक सांभाळून कायमस्वरूपी घर मिळवून देण्यापर्यंत हे रक्षक सर्व जबाबदाऱ्या पार पाडतात.

खोपोलीकर त्यांना प्राण्यांचे फरिश्ते म्हणतात. खोपोलीत अद्याप प्राणी आश्रयस्थान किंवा मोठे पशुवैद्यकीय रुग्णालय उपलब्ध नसताना, या रक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्राणी कल्याण, भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि जबाबदारीने पाळीव प्राणी सांभाळण्याबाबत ते सातत्याने जनजागृतीही करतात.

मर्यादित साधनसामग्री असूनही हे कार्य समाजाच्या मदतीने आणि थोड्याथोडक्या खूप पुंजा देणग्यांवर सुरू आहे. त्यांच्यामुळे अनेक युवक आता या कार्यात भाग घेत आहेत - कोणीतरी खायला घालतो, कोणीतरी रेस्क्यूला मदत करतो, तर कोणीतरी तात्पुरते निवारा देतो.

खोपोली शहर झपाट्याने वाढत असताना, येथे अधिक संरचित प्राणी सेवांची गरज वाढत आहे, पण तोपर्यंत, खोपोलीचे हे प्राणी रक्षक अनेकांच्या जीवनात एक प्रेरणा ठरत आहेत - प्राण्यांच्या नव्हे तर संपूर्ण समाजाच्या हृदयात स्थान मिळवणारे नायक.

आपणही या कार्यात मदत करू इच्छित असाल, तर खोपोली ॲनिमल रेस्क्यूअर यांच्याशी सोशल मीडियावर किंवा स्थानिक समुदाय गटांद्वारे संपर्क साधू शकता, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. पवन जाधव, ॲड. श्रुती चौधरी, अमेय साखरे, ओम वंजारी, रोहन पुरी इत्यादी उच्चशिक्षित तरुण या सामाजिक कार्यात योगदान देत आहेत.

# जावळी न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कुल जावळी शाळेच्या सन २००४-२००५ दहावीतील बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवारी (दि.२०) न्यू इंग्लिश स्कूल जावळी हायस्कुलमध्ये उत्साहात झाला. या स्नेहमेळाव्यात हायस्कुलचे आजी, माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी झाले होते.

२० वर्षांनी एकत्रित येत या विद्यार्थ्यांनीआपली शाळा भरल्याप्रमाणे जुन्या, नवीन आठवणींना उजाळा देत जेवणाचा आस्वाद घेत भरपूर मौजमजा केली.

मेळाव्यात प्रत्येकाने खरंच खुप मज्जा केली आणि अतिशय सुंदर व सुखद अनुभव घेऊन अशाच आठवणी कायम सोबत रहाव्या यासाठी आपण सर्वानी दरवर्षी एकत्र भेटूया असा संकल्प सर्वानी केला. या मेळाव्यात न्यू इंग्लिश स्कुल जावळी शाळेचे शिक्षक मंगेश बुटे, विजय इसाई, सोपान बर्गे, नेहा केकाणे, मंगल भोईर, गणेश गिरी, संजय घोडके, शिपाई विजय खराडे, मारुती पाबरेकर यांच्यासह शाळेचे सन २००४ - २००५ चे दहावीतील बॅचचे माजी विद्यार्थी नयन दसवते, अल्पेश जंगम,काळुराम पालकर, नितीन दसवते, बाबू पालकर, नितेश करकरे, राजेंद्र कोलथरकर, अल्पेश तेटगुरे, सूर्यकांत म्हस्के, दिनेश भोसले, महेश टेंबे, तेजस म्हस्के, अभिजित तेटगुरे, अल्पेश सुतार, प्रभाकर टकले, विष्णू वाघोस्कर, सचिन शिंदे, गितेश जाईलकर, पंढरी जाईलकर, सतीश वाघमारे, संदेश जुमारे, नागेश सुर्वे, राकेश शिर्के, रवींद्र सुतार, शुभांगी म्हस्के, अर्चना पालकर, राणी मारणे, दिपाली मारणे, माई केकाणे, मंगला खाडे, प्रतिभा तेटगुरे आदी माजी विध्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांनी स्नेह मेळाव्याची सायंकाळी उत्साहात सांगता करून पुढील वर्षी पुन्हा भेटण्याचा मनोदय व्यक्त केला.



# मुंबईच्या विजयाची हॅट्ट्रिक!

## चेन्नईवर एकतर्फी मात; रोहित, सूर्या तळपले



**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवच्या शतकी भागीदारीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने रविवारी आयपीएलमध्ये सलग तिसरा विजय मिळवला आहे. रोहित आणि सूर्या यांनी १००पेक्षा अधिक धावांची भागीदारी रचत चेन्नईवर तब्बल नऊ विकेट्सने मोठ्या विजयाची नोंद केली.

चेन्नईने प्रथम फलंदाजी करत पाच विकेट्स गमावत १७६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईने १५.४ षटकांत एक गडी गमावून विजयी लक्ष्य गाठले. सामन्यात रोहितने या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावले. सूर्यकुमार यादवनेही अर्धशतकी खेळी केली. रोहितने नाबाद ७६ (सहा षटकार व चार चौकार), तर सूर्याने नाबाद ६८ (पाच षटकार व सहा चौकार) धावा केल्या. मुंबईकडून एकमेव रायन रिकल्टन हा फलंदाज १९ चेंडूत २४ धावा करून बाद झाला.

तत्पूर्वी चेन्नई सुपर किंग्सच्या फलंदाजीला फारशी चांगली सुरुवात झाली नाही. चेन्नईने ११ षटकांत तीन गडी गमावून ७३ धावा करता आल्या. यानंतर, रवींद्र जडेजा आणि शिवम दुबे यांनी अर्धशतके झळकावली. शिवमने ३२ चेंडूत ५० धावा केल्या, तर रवींद्र जडेजा ३५ चेंडूत ५३ धावा करून नाबाद राहिला.

याशिवाय १७ वर्षीय आयुष म्हात्रेने पदार्पणवीर १५ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. सलामीवीर शेख रशीदनेही १९ धावांचे योगदान दिले. दुसरीकडे मुंबईकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या, तर दीपक चहर, अश्विनी कुमार आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. या विजयासह मुंबई इंडियन्सचा संघ आठ गुणांसह सहाव्या स्थानी पोहचला आहे.

# बीसीसीआयकडून वार्षिक कराराची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) २०२४-२५ हंगामासाठी टीम इंडियाच्या वरिष्ठ पुरुष खेळाडूंसाठी वार्षिक करार जाहीर केले आहेत. रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांचे ए प्लस ग्रेड खेळाडूंच्या यादीत स्थान कायम राहिले आहे.

बीसीसीआयने सोमवारी २०२४-२५ हंगामासाठी खेळाडूंचे केंद्रीय करार जाहीर केले, ज्यात कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही वार्षिक कराराच्या यादीत अव्वल स्थान कायम ठेवले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, गेल्या वर्षी

## श्रेयस आणि इशानचे कमबॅक



यादीतून वगळलेले श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना यंदाच्या वार्षिक करारांमध्ये स्थान मिळाले.

मोहम्मद सिराज, केएल राहुल, शुभमन गिल, हार्दिक पांड्या, मोहम्मद शमी आणि ऋषभ पंत यांना ए ग्रेडमध्ये नव्याने स्थान देण्यात आले आहे, तर सूर्यकुमार यादव, कुलदीप यादव, अक्षर पटेल, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर यांचा बी ग्रेड खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना अनुक्रमे ग्रेड बी आणि ग्रेड सी खेळाडूंमध्ये स्थान देण्यात आले आहे. गेल्या वर्षी त्यांना करारातून वगळण्यात आले होते, कारण त्यांनी रणजी ट्रॉफीमध्ये न खेळण्याचा निर्णय घेतला होता. यावर बीसीसीआयने नाराजी व्यक्ती केली होती.

### करारबद्ध खेळाडूंची यादी

**अ+ श्रेणी :** विराट कोहली, रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा.

**अ श्रेणी :** ऋषभ पंत, मोहम्मद सिराज, के. एल. राहुल, शुबमन गिल, हार्दिक पंड्या आणि मोहम्मद शमी.

**ब श्रेणी :** श्रेयस अय्यर, कुलदीप यादव, अक्षर पटेल, यशस्वी जैस्वाल आणि सूर्यकुमार यादव.

**क श्रेणी :** इशान किशन, नितीश कुमार रेड्डी, ध्रुव जुरेल, अभिषेक शर्मा, सर्फराझ खान, आकाश दीप, वरुण चक्रवर्ती वर हर्षित राणा.

# रोहा चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धा रंगणार

**रोहे : प्रतिनिधी**

येथील कट्टर दोस्ती ग्रुप आयोजित प्रकाशझोतातील रोहा चॅम्पियन ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम भुवनेश्वर येथे २४ ते २७ एप्रिलदरम्यान रंगणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या चार संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक, अंतिम विजेता संघाच्या मालकास टु व्हिलर तसेच मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आदी बक्षिसे देण्यात येणार आहे. सामन्यांचे थेट प्रक्षेपण GT sports या युट्यूब चॅनेलवर होणार आहे.

स्पर्धेत सहभागासाठी तुषार शिंदे (९२७०९९५९९६), विशाल शेलार (९२२६५६०१३९), नितेश जाधव (७५१७००३४५६) अंकित मोहिते (८१४९९९९६९१), राकेश पडवळ (९२७३५३५६७९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# आरडीसीएच्या लीगसाठी खेळाडूंचा ऑक्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या टी-२० क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेसाठी सर्व नोंदणीकृत खेळाडूंचा ऑक्शन (लिलाव) खोपोली येथील कॅम्पोलियन हॉटेल अ‍ॅण्ड रिसॉर्टमध्ये नुकताच झाला. या वेळी चषकांचेही अनावरण करण्यात आले. स्पर्धा मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होणार आहे.

ऑक्शन व चषकांच्या अनावरण सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार अनिकेत तटकरे, कामगार नेते महेंद्र घरत, आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, उपाध्यक्ष यशवंत साबळे, राजेश पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य समीर मसुरकर, किरीट पाटील, कौस्तुभ जोशी, प्रदीप खलाटे, अ‍ॅड. पंकज पंडित यांच्यासह जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमी मंडळी उपस्थित होती.

आरडीसीएच्या प्रीमियर लीगमध्ये समीरा हैबिटैट्स अलिबाग जेट्स, टीआयपीएल पनवेल किंग्स, रोहा रॉयल्स, पीसीए पेण बाप्पा, लावास रॉयल्स महाड माणगाव लायन्स, के.श्री कर्जत खालापूर वॉरियर्स, एम.जी. मराठा उरण टायटन्स, रोशन क्रिकेट अकॅडमी सुधागड फायटर्स असे आठ संघ सहभागी झाले आहेत. प्रत्येक संघाने जिल्ह्यातील नोंदणीकृत खेळाडूंवर बोली लावून त्यांना आपल्या संघात समाविष्ट करून घेतले. ऑक्शन व चषक अनावरण सोहळा यूट्यूब लाईव्ह प्रदर्शित करण्यात आल्याने सर्व क्रिकेटप्रेमींना त्याचा आनंद घेता आला.

# आरसीएफतर्फे जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल अ‍ॅण्ड फर्टीलायझर्स (आरसीएफ) लि., थळ यांच्यातर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहकार्याने कामगार स्मृती चषक जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १ मे रोजी आरसीएफ वसाहत कुरूळ येथील क्रीडा संकुलात ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे.


(संग्रहित)

स्पर्धेतील विजेत्या चार संघांना तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट पकडपटू, उत्कृष्ट चढाईपटू यांच्यासाठी रोख रक्कम व चषक अशी वैयक्तिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. आरसीएफ थळचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात येईल.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी केवळ २० रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात येणार आहे. एका आदिवासी पाड्यातील, वाडीतील एकच संघ स्पर्धेसाठी पात्र असेल. प्रथम नोंदणी करणाऱ्या ६४ संघाना स्पर्धेत प्रवेश दिला जाईल. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या आदिवासी संघानी आपले प्रवेश अर्ज २७ एप्रिलपर्यंत आरसीएफ वसाहत, कुरूळ येथील क्रीडा कार्यालय किंवा वाचनालय येथे जमा करावेत. स्पर्धेविषयी अधिक माहिती आणि नोंदणीसाठी आरसीएफचे पांडुरंग सोनार (८८०५०८०२३२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आरसीएफ प्रशासनाने केले आहे.

# राष्ट्रीय स्पर्धेत अ‍ॅथलेटिक्समध्ये हरियाणाला विजेतेपद

## व्हॉलीबॉलमध्ये हिमाचल प्रदेश, कॅरममध्ये महावितरण विजेते

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४६व्या राष्ट्रीय स्पर्धेत अ‍ॅथलेटिक्समध्ये पुरुष गटात हरियाणा संघाने विजेतेपद, महिला गटात महावितरणला विजेतेपद, व्हॉलीबॉलमध्ये हिमाचल प्रदेशला विजेतेपद, पंजाबला उपविजेतेपद, तर कॅरममध्ये पुरुष गटात महावितरणला विजेतेपद व महिला गटात महावितरणनेच विजेतेपद पटकावले.

स्पर्धेमध्ये एकूण १३ संघानी सहभाग नोंदविला. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात महापारेषण, महानिर्मिती व महावितरण कंपनीच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या तीन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.



बक्षीस वितरण समारंभाला महानिर्मितीचे संचालक अभय हर्णे, महापारेषणच्या कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता तथा क्रीडा स्पर्धा आयोजन समितीच्या अध्यक्ष शिल्पा कुंभार, महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय कुऱ्हाडे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे अधिष्ठाता डॉ. शरद बनसोडे, स्पर्धेचे निरीक्षक अमरेंद्र सिंह, सुरेंदर शेवकंद, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा उपाध्यक्ष भरत पाटील, महानिर्मितीचे सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड, महावितरणचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर, महानिर्मितीचे कल्याण अधिकारी प्रसाद निकम, अधीक्षक अभियंता श्रीकृष्ण नवलाखे, महेंद्र गायकवाड, अशोक सागरे, सहाय्यक महाव्यवस्थापक प्रशांत चौधरी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन महेंद्र कुलकर्णी व सुरेश पाटील यांनी केले.

# विराट बनला आयपीएलधील सर्वाधिक वेळा ५०+ धावा करणारा फलंदाज

**मुल्लनपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्सविरुद्धचा सामना सात गडी राखून जिंकत या हंगामातील पाचव्या विजयाची नोंद केली. या सामन्यात आरसीबीसाठी विराट कोहलीने शानदार अर्धशतकी खेळी करत एक मोठा विक्रमही आपल्या नावे केला. विराट आयपीएलच्या २५२ डावांमध्ये सर्वाधिक ५०+ धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने ६७ वेळा ५०+ स्कोअर केले आहेत.

पंजाब किंग्सविरुद्धच्या मागील सामन्यात विराट कोहली फक्त १ धाव काढून बाद झाला होता, पण रविवारच्या सामन्यात त्याने पुन्हा एकदा आपल्या जुन्या अंदाजात फलंदाजी केली आणि चाहत्यांची मने जिंकली. विराटने या सामन्यात नाबाद ७३ धावांची अकर्षक खेळी करून आरसीबीला विजय मिळवून दिला.

विराट आता आयपीएलमध्ये सर्वाधिक ५०+ धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने या बाबतीत डेव्हिड वॉर्नरचा विक्रम मोडीत काढला. त्याने आयपीएलमध्ये ६६ वेळा ५०+ धावा केल्या आहेत. आता विराटच्या नावावर आयपीएलमध्ये आठ शतके आणि ५९ अर्धशतके नोंदवलेली आहेत. अशा प्रकारे त्याच्या नावावर ६७ वेळा ५०+ धावांच्या खेळीची नोंद झाली आहे.




# आयुष म्हात्रेचा लहानपणीचा व्हिडीओ होतोय व्हायरल



**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नईकडून आयपीएलमध्ये पर्दापण करणारा १७ वर्षीय आयुष म्हात्रे याने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात स्फोटक फलंदाजी करून सर्व चाहत्यांची मने जिंकली. आयुषने अवघ्या २५ चेंडूत ३२ धावा केल्या. यानंतर आयुषचा लहानपणीचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे, जो ११ वर्षे जुना आहे.

व्हायरल व्हिडीओमध्ये आयुष म्हात्रे अवघ्या सहा वर्षांचा आहे. त्या वेळी त्याला काही प्रश्न विचारले जात आहेत, त्या प्रश्नांची उत्तरे तो एका शब्दात देत आहे. त्यानंतर आयुषच्या आजोबांनी काही प्रश्नांची उत्तरे दिली, जे त्यांच्या नातावाला मुंबईच्या मैदानावर खेळायला घेऊन जायचे.

आयुष म्हात्रेने गेल्या वर्षी इराणी ट्रॉफीमध्ये मुंबईच्या संघाकडून पदार्पण केले. इराणी ट्रॉफीमध्ये त्याने पहिला सामना रेस्ट ऑफ इंडियाविरुद्ध खेळला. त्याने मुंबई संघासाठी एकूण नऊ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, ज्यात दोन शतक आणि एक अर्धशतकाचा समावेश आहे. आयपीएलच्या डेब्यू सामन्यातच आयुष म्हात्रेच्या नावावर नवा विक्रम नोंदवला गेला. तो चेन्नईकडून खेळणारा सर्वात युवा फलंदाज ठरला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com